**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०८**
**मा.स्थायी समिती सभेची नोटीस (ऑनलाईन झुम अॅप द्वारे)**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २० / १०/२०२१

प्रति,
मा. ------------------------------------
स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा क्रमांक ०८ सोमवार दिनांक २५/१०/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता मा.उपसचिव , महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक २८ जून २०२१ च्या पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन झुम अॅप द्वारे आयोजित करण्यात आली आहे. या सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत.

तरी सदर सभेत आपण ऑनलाईन सहभागी व्हावे अशी विनंती आहे.

सही /-
प्र.नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**सोमवार दिनांक - २५/१०/२०२१ ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| १०४ | मा.स्थायी समिती सभा क्र. ०४ बुधवार दिनांक ११ /११/२०२० , मा.स्थायी समिती सभा क्र.०५ सोमवार दि.२८/१२/२०२० , मा.स्थायी समिती सभा क्र. ०६ मंगळवार दिनांक ०९/०२/२०२१ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणे |
| १०५ | अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग वॉर्ड क्र.१६ बील क्रमांक ६२० या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत भोगवटदार शहर सहकारी बॅंक.यांच्या नांवे असलेली घरपट्टीची रक्कम निर्लेखित करणे बाबतचाऑफिस रिपोर्ट. |
| १०६ | अर्जदार श्री अजय साहेबराव बारस्कर यांचे प्रभाग समिती क्र.१ अंतर्गत नागापुर वसुली विभाग वॉर्ड क्र.६६ बील क्रमांक ३१४ वर आकारण्यात आलेली घरपट्टीची रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १०७ | अर्जदार श्री. अनंत गंगाधर दामले, रा. बालिकाश्रम रोड, अ.नगर यांचे प्रभाग समिती क्र.३ वॉर्ड क्र.४२ बील नं. १०८३/१ चे एक १/२ घरगुती नळ कने. आकारणी रद्द करून आकारणी रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १०८ | अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभागासाठी लिक्वीड क्लोरीन गॅस सिलेंडर -९०० kg x ६० सिलेंडर जरूरीप्रमाणे खरेदीकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट . |
| १०९ | अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेशपात्र स्त्री कर्मचा-यांसाठी गणवेश व गणवेश कापड खरेदीकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये महितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ११० | अहमदनगर महानगरपालिकेकरीता शव वाहिका (Hearse Van) खरेदी करणे कामी सन २०२१-२२ ई - निविदा क्र. T.ID ६७८७०० खरेदी कामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये महितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| १११ | अहमदनगर महानगरपालिकेकरीता Truck Chassis Mounted Jetting मशिन वाहन खरेदी करणे कामी प्रसिध्द जाहिर Goverment e Marketplace (GeM) पोर्टल वरून खरेदी कामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये महितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ११२ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे.दवाखाना व प्रसुती गृहाकरीता शहरातील इच्छुक व अनुभवी स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांचे मानधन वाढ निश्चित करून व्हिजीट बेसवर पॅनल शिपवर नेमणूक करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ११३ | अहमदनगर महानगरपालिका संचलीत कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथे वैद्यकीय व नीमवैद्यकीय कर्मचारी वर्ग बाह्य यंत्रणेमार्फत (आउटसोर्सीग व्दारे ) अभिकर्त्यांमार्फत पुरविणेकामी ई - निविदा प्रक्रियेव्दारे / संस्था नियुक्ती करणे कामी प्राप्त दरास मान्यता देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ११४ | अहमदनगर महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारतीच्या अवारातील १०X२० (१८.५९ चौ.मी.) फुटाची मोकळी जागा लिलावधारक श्री. निखील मिनीनाथ दडगे यांना अटी व शर्ती नुसार भाडेतत्वावर देणेबाबत ऑफिस रिपोर्ट |
| ११५ | अहमदनगर येथील नालेगांव स.नं. २४६ पैकी नाका चौकाचे बाजुच्या संरक्षण भिंतीच्या आतील बाजुची रस्त्यालगतची मनपाच्या मालकीची १५x २० फुट क्षेत्राची खुली जागा लिलावधारक श्री. स्वप्निल दिपक गडाख यांना अटी व शर्ती नुसार भाडेतत्वावर देणेबाबत ऑफिस रिपोर्ट |
| ११६ | अहमदनगर येथील नालेगांव स.नं. २४६ पैकी नाका चौकाचे बाजुच्या संरक्षण भिंतीच्या आतील बाजुची रस्त्यालगतची मनपाच्या मालकीची १५x २० फुट क्षेत्राची खुली जागा लिलावधारक श्री. शिवदास विठ्ठल वांढेकर यांना अटी व शर्ती नुसार भाडेतत्वावर देणेबाबत ऑफिस रिपोर्ट |
| ११७ | बांधकाम विभाग व अग्निशमन विभागाचे सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ११८ | घनकचरा विभाग व पाणीपुरवठा विभागाचे सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ११९ | अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीच्या नोंदी अदयावत करणे करीता कंत्राटी पध्दतीने तहसिलदार/नायब तहसिलदार/अव्वलकारकुन पैकी एक महसूल व दोन भुमापक यांनी नेमणूक करणेसाठी जाहिर निविदा मागविणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १२० | गटर दुरूस्ती सन २०२१-२२ करीता फेर ई - निविदा क्र.२ ई - निविदा क्र.७११०३९ महानगरपालिकेच्या गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता विर्षीक दर निविदा मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट.(प्रभाग समिती क्र.१ व ३) |
| १२१ | तिसरी फेर ई-निविदा क्र.७२००८९ अहमदनगर महानगरपालिका हददीतील शहर व उपनगर मधील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या दृष्टीने महत्वाच्या मार्ग रस्त्याचे पॅचिंग करणे (प्रभाग क्र.१ ते ८ अंतर्गत ) या कामाच्या निविदा मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १२२ | नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना फेर ई- निविदा क्रमांक ६९०९५४ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०१ मधील लक्ष्मी कॉलनी व श्रीकृष्णनगर परीसर रस्ते डांबरीकरण करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १२३ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गुलमोहर रोड, सुरभि हॉस्पीटल ते कुष्ठधाम रोड पर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |

| | |
|---|---|
| १२४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील तारकपुर रोड, मनमाड रोड ते मिस्कीन मळा रोड ते तोफखाना पोलीस स्टेशन पर्यत रस्त्याच्या एका बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १२५ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.२ आणि वॉर्ड क्र.४ मधील गुलमोहर पोलीस चौकी ते पाईप लाईन रोड श्रीराम चौक पर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १२६ | अहमदनगर महानगरपालिका पाईप लाईन रोड हददीतील औरंगाबाद रोड ते नामदेव चौक ते श्रीराम चौक ते मनमाड रोड पर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १२७ | अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद लेखाशिर्ष (०९१३ २२१७) प्रभाग क्र.१४ मधील रस्ता मजबुतीकरण व कॉक्रीटीकरण करणे. ई-निविदा क्र.६९४१६८ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १२८ | अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद लेखाशिर्ष (०९१३ २२१७) प्रभाग क्र.११ मधील रस्ता मजबुतीकरण,नुतनीकरण व कॉक्रीटीकरण करणे. ई-निविदा क्र.६९४१४७ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १२९ | कोव्हिड- १९ प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणेकामी अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोव्हिड -१९ बाधीत उपचार देणेकामी डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे मेडीकल कॉलेज ॲन्ड हॉस्पीटल यांचेशी सामंजस्य करार करून कार्यारंभ ओदेश देणेस मंजुरीस्तव व प्राप्त दरास मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १३० | अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोव्हीड -१९ संशयीत /संपर्कातील व्यक्तींचे आर.टी.पी.सी.आर.चाचणी खाजगी मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडून करून घेणेबाबतचे देयके अदा करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

**टिप** :- १] प्रत्येक सदस्यांने आपल्या Android / Smartphone मध्ये Playstore वरून Zoom App डाउनलोड करून घ्यावे.

२] Zoom App द्वारे प्रत्येक सदस्यांना मा.स्थायी समिती सभेस उपस्थित राहता येईल.

३] मा.उपसचिव,महाराष्ट्र शासन नगरविकासविभाग यांचेकडील दि. २८ जून २०२१ च्या पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन झुम ॲप द्वारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रिये संदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा.सदस्यांनी महापालिका सिस्टीम मॅनेजर श्री.अंबादास साळी मो.नं.९५६१००४६४४ यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत**- १] विषय क्रमांक- १०४ - मा.स्थायी समिती सभा क्र.०४ बुधवार दिनांक ११ /११/२०२० , मा.स्थायी
समिती सभा क्र.०५सोमवार दि.२८/१२/२०२० , मा.स्थायी समिती सभा क्र. ०६ मंगळवार दिनांक ०९/०२/२०२१ रोजीच्या सभांचे इतिवृत्ताची प्रत.

२] विषय क्रमांक- १०५ ते १३० च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

सभेचा अजेंडा प्रसिध्द झाल्यानंतर मा.महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि१४दिनांक २२ ऑक्टोंबर २०२१ रोजी सर्व सभा/बैठका प्रत्यक्ष उपस्थित घेणे बाबतचे परिपत्रक प्राप्त झाल्याने ऑनलाईन पध्दतीने असणारी सभा प्रत्यक्ष उपस्थितीमध्ये पार पडली आहे.त्यामुळे सभेचा अजेंडा जरी ऑनलाईन घेणे बाबतचा असला तरी प्रत्यक्षात सभा ऑफलाईन झालेली आहे.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- १०४ सोमवार दि.२५/१०/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्र. ०४ बुधवार दिनांक ११ /११/२०२० , मा.स्थायी समिती सभा क्र.०५ सोमवार दि.२८/१२/२०२० , मा.स्थायी समिती सभा क्र. ०६ मंगळवार दिनांक ०९/०२/२०२१ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका नगरसचिव विभाग

मा.स्थायी समिती सभा क्र. ०४ बुधवार दिनांक ११ /११/२०२० , मा.स्थायी समिती सभा क्र.०५ सोमवार दि.२८/१२/२०२० , मा.स्थायी समिती सभा क्र. ०६ मंगळवार दिनांक ०९/०२/२०२१ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---**---

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मागील सभेचे इतिवृत्ताचे वाचन करा.

मागील सभा क्र. ४,५ व ६ सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.शाम नळकांडे :- इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्र. ०४ बुधवार दिनांक ११ /११/२०२० , मा.स्थायी समिती सभा क्र.०५ सोमवार दि.२८/१२/२०२० , मा.स्थायी समिती सभा क्र. ०६ मंगळवार दिनांक ०९/०२/२०२१ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांत येत आहे.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्र. ०४ बुधवार दिनांक ११ /११/२०२० , मा.स्थायी समिती सभा क्र.०५ सोमवार दि.२८/१२/२०२० , मा.स्थायी समिती सभा क्र. ०६ मंगळवार दिनांक ०९/०२/२०२१ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

सुचक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- १०५ सोमवार दि.२५/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग वॉर्ड क्र.१६ बील क्रमांक ६२० या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत भोगवटदार शहर सहकारी बॅक.यांच्या नांवे असलेली घरपट्टीची रक्कम निर्लेखित करणे बाबतचाऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका शहर वसुली विभाग

प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग वॉ.क्र.१६ वसुली मदतनिस यांजकडून िविनंती प्रस्ताव देण्यात येतो की,वपॉ.क्र.१६ बिल क्र.६२० अहमदनगर महानगरपालिका भोग- शहर सहकारी बॅक लि.शिंदे गल्ली,अहमदनगर या नांवे वसुली अभिलेखात नोंदआहे.सदर मिळकत जागा अहमदनगर महानगरपालिकेची असून उक्त मिळकत माळीवाडा शॉपिंग सेंटर आहे.

अहमदनगर महानगरपालिका ठराव क्र.२१ दि.३१/०१/२०१५ अन्वये रेडीरेकनच्या दराने भाडे व अनामत घेवून ठराव पारित झालेला आहे.त्यानुसार शहर सहकारी बॅकेस पहिल्या मजल्यावरिल हॉल भाडे तत्वावर देण्यात आलेला होता.तथापि बॅकेने दि.३०/०१/२०१७ रोजी मार्केट विभागाने हॉल ताबा घ्यावा असे कळविले त्यानुसार मार्केट विभागाने दि.२८/०२/२०२१७ रोजी समक्ष जागेवर पंचनामा करून हॉल ताब्यात घेतला आहे.भोगवटादार यांनी घरपट्टी करासंदर्भातील कर सन २०१६-१७ पावती क्र.ए.एस.९८५६ दि.२६/०४/२०१६ अन्वये रक्कम रू. २७८५०/- वसुल केला आहे.भोगवटदार यांनी दाखल केलेलया अर्जानुसार सन २०१७-१८ पासून आकारणी रद्द करणे बाबत कार्यालयीन प्रस्ताव तात्कालीन लिपीक यांनी मंजुरीस्तव पाठविणे क्रमप्राप्त असतांना सदरहु अर्ज प्रलंबिल असल्याने निदर्शनास येते.अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार तसेच मार्केट विभागाकडील पंचनाम्यानुसार दि.२९/०१/२०१९ रोजीच्या समक्ष स्थळ पहाणी नुसार मालमत्ता १६/६२० नविन मालमत्ता क्र.झेड -२१६०८७५६७ करयोग्य मुल्य रक्कम रू.६२,२३०/- असून सदर बिलावर सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ आखेर रक्कम रू.१,९०,०४६/- थकबाकी दिसुन येत आहे.

सदर बिलाची मालमत्ता कर व इतर कराची कोणत्याही प्रकारे वसुली होणार नसल्याने तसेच सदरची मालमत्ता ही बंद स्वरूपात व महानगरपालिकेची असल्याने मालमत्ता कराचे बिल बंद करणेस महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कराधान प्रकरण ८ कलम ५१ नुसार शास्ती फी किंवा ससुलीचा खर्च माफ करता येईल.मा.आयुक्त साहेब यांना आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार नियम ४१ खालील शास्ती किंवा नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा ख्र्च पुर्ण किंवा अंशत माफ करता येईल अशी तरतुद असून उक्त तरतुदींचे अनुषंगाने अभिलेखा पडताळणी नुसार व कलम १५२ नुसार व नियम ५० अन्वये बिल.क्र.६२० व त्यावरील एकुण रक्कम रू.१,९०,०४६/- निर्लेखित करणे कामी प्रस्ताव मन्यतेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली मदतनीस यांचा अहवाल असे.

यावर करनिरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली मदतनीस यांचे प्रस्तावानुसार सविनय सादर.

यावर प्रभागा अधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावित नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर सहा.करमुल्यनिर्धारण अधिकारी यांचा अभिप्राय की,विभागाने सादर केलेला प्रस्ताव अ नुसार मान्यतेस्तव व आदशार्थ सादर.

यावर सहाय्यक आयुक्त (कर) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ प्रमाणे आदशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेसाठी स्थायी समिती शिफारस करणेस मान्यता मिळावी ही विनंती.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,सदर प्रस्ताव उशिरा पाठविणे साठी जबाबदारी निश्चित करून फेर सादर करणे.

यावर वसुली मदतनीस यांचा अभिप्राय की,प्रस्तुत प्रकरणी दिनांक ११/०८/२०२१ चे शेरांकनानुसार प्रभाग समिती क्र.२ ,शहर वसुली विभागाकडील वॉ.क्र.१६ मध्ये वसुलीचे कामकाज विषयी दिलीप कोतकर हे कर्मचारी कार्यरत होते.सदर कर्मचारी यांचे सन २०१९ मध्ये निधन झालेले आहे.
तरी येणे प्रमाणे फेर सविनय सादर.

यावर करनिरीक्षक यांचा अभिप्राय की,सदर कर्मचारी निधन झालेले आहे.त्यानुसार फेरसादर.

यावर प्रभाग अधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,संबंधिताने सदर बाब वरिष्ठांच्या निदर्शनास आणलेली आहे अगर कसे?

यावर वसुली मदतनीस यांचा अभिप्राय की,प्रस्तुत प्रकरणी दिनांक ३१/०८/२०२१ चे शेरांकनानुसार संबंधित कर्मचारी यांनी सदर मिळकती सांदर्भातील बाब वरिष्ठांचे निदर्शनास आणुन दिली किंवा कसे या बाबत माहिती आढळून येत नाही.

यावर कर निरीक्षक यांची स्वाक्षरी.

यावर प्रभाग अधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग वॉर्ड क्र.१६ बील क्रमांक ६२० या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत भोगवटदार शहर सहकारी बॅक.यांच्या नांवे असलेली घरपट्टीची रक्कम निर्लेखित करणे बाबतचाऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.डॉ. सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग वॉर्ड क्र.१६ बील क्रमांक ६२० या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत भोगवटदार शहर सहकारी बॅक.यांच्या नांवे असलेली घरपट्टीची रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग वॉर्ड क्र.१६ बील क्रमांक ६२० या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत भोगवटदार शहर सहकारी बॅक.यांच्या नांवे असलेली घरपट्टीची रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.डॉ. सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री. प्रकाश भागानगरे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- १०६ सोमवार दि.२५/१०/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री अजय साहेबराव बारस्कर यांचे प्रभाग समिती क्र.१ अंतर्गत नागापुर वसुली विभाग वॉर्ड क्र.६६ बील क्रमांक ३१४ वर आकारण्यात आलेली घरपट्टीची रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक १ नागापुर

मालमत्ता कर वसुली वॉर्ड क्रमांक ६६ चे वसुली लिपीक यांजकडून विंनीत रिपोर्ट देण्यात येतो की,मालमत्ता कर वसुली वॉर्ड क्र.६६ मधिल अनुक्रमांक ३१४ वर नोंदणी असलेले मालमत्ताधारक श्री.अजय साहेबराव बारस्कर यांनी दि.०४/०६/२०१८ रोजी अर्ज देवून अनंक्रमांक ३१४ वरील मालमत्तेत बांधकाम अस्तित्वाववत नसुन व संदरील मालमत्ता ही शेतजमीन स्वरूपाची असल्याने नुमुद करून सदरच्या मालत्तेवर आकररण्यात आलेली मालमत्ताकराची आकारणी रद्द करून त्यावर दर्शविलेली थकबाकी रक्कम रद्द करणेबाबत विनंती अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार यांच्या विनंती अर्जानुसार सदरील मालमत्तेची समक्ष स्थ पहाणी दि.०१/०१/२०२१ रोजी केली असता सदरील मालमत्ता ही मोकळया स्वरूपाची असल्यनेचे आढळुन आले असून सदरील वॉर्ड क्र.६६ वसुली काकाजासाठी सन २०१६/२०१७ पासुन माझी नियुक्ती झालेली असून सदरील मालमत्तेत कोणत्याही प्रकारचे गांधकाम अस्तित्वात नसल्याचे आढळुन आल्याने व सदरील मालमत्तेचा वापर कोणही करीत नसल्याचे मालमत्ता कराचे दयक बजावताना निदर्शनास आले.तसेच मनपा अभिलेख परिशिष्ठ अ तपासणी केली असता परिशिष्ठ अ वर श्री.अजय साहेबराव बारस्कर या नावाची नोंद असल्याने तपासणीअंती आढळून येते तसेच स्टोअररूम व पढवी क्षेत्र ९८.४० चौ.मी.पत्रा बांधकामाची नोंद असल्याचे आढळुन येत आहे.

तरी सदील वॉर्ड क्र.६६ वसुली कामकाजासाठी सन २०१६/२०१७ पासुना माझाी नियुक्ती झालेली असून सदरील वॉर्डची जबाबदारी सोपविण्यात आल्यापासुन कोणत्याही प्रकारचे बांधकाम अस्तित्वात नसल्याचे आढळुन येते.तसेच सदरील मालमत्ता ही शेती स्वरूपाची असल्याने सन २००३-२००४ पासुन कर आकारणी कायमस्वरूपी रद्द करणे बाबत महाराष्ट्र अधिनियम महानगरपालिका १९४९ अनुसुची ड प्रकरण (८) कराधाननियम २० (क) (ड) (ई ) (फ) नुसार दुरूस्तीस अहवाल सविनय सादर.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मालमत्ता धारक अजय साहेबराव बारस्कर यांची मालमत्ता असलेली जागा ही शेतजमीन असुन सध्या त्यामध्ये कुठल्याही स्वरूपाची बांधकाम नसुन मोकळा भुखंड असल्याचे निदर्शनास येत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल कलम २० (क) (ड) (ई ) (फ) अन्वये बिलरद्द करणे उचित वटते.तथापी आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.१ यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांनी केलेली समक्ष पहाणी ७/१२उतारा व ओपन जागेचा फोटो पहाता वसुली लिपीक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार चुकीची झालेली कर आकारणी निर्लीखित करणे तथापी आदशार्थ सादर.

यावर रिव्हीजन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,सदर प्रस्तावामध्ये मिळकतीवरील थकबाकीचा उल्लेख केलेला नाही थकबाकी नमुद करा.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,सदरील मा.क्र.Z१६६०२५१७१ वरील निव्वळ थकबाकी रक्कम १००६८५/-ही वरील कलमान्वये र्निलेखीत करणे तथापी आदेशर्थ सादर.

यावर रिव्हीजन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,विभागाने सादर केल्या नुसार कर निरीक्षक व प्रभाग अधिकारी यांचे समक्ष पहाणी अहवाला नुसार अर्जदार यांचे जागे मध्ये बांधकाम नसुन जागा रिकामी (मोकळी जागा) असल्याने नमुद केले आहे.त्यानुसार सदरचा प्रस्ताव दुरूस्तीस हरकत नाही तसेच थकबाकीची रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार निर्लेखित करणे साठी मा.स्थायी समितीकडे पाठविणे योग्य होईल तथापी आदशार्थ सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,As proposed for Standing Comitte of Rs १००६८५/-amout to be Waive

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री अजय साहेबराव बारस्कर यांचे प्रभाग समिती क्र.१ अंतर्गत नागापुर वसुली विभाग वॉर्ड क्र.६६ बील क्रमांक ३१४ वर आकारण्यात आलेली घरपट्टीची रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.डॉ. सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री अजय साहेबराव बारस्कर यांचे प्रभाग समिती क्र.१ अंतर्गत नागापुर वसुली विभाग वॉर्ड क्र.६६ बील क्रमांक ३१४ वर आकारण्यात आलेली घरपट्टीची रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार श्री अजय साहेबराव बारस्कर यांचे प्रभाग समिती क्र.१ अंतर्गत नागापुर वसुली विभाग वॉर्ड क्र.६६ बील क्रमांक ३१४ वर आकारण्यात आलेली घरपट्टीची रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.डॉ.सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :-मा.श्री. प्रकाश भागानगरे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८

विषय क्रमांक- १०७ सोमवार दि.२५/१०/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. अनंत गंगाधर दामले, रा. बालिकाश्रम रोड, अ.नगर यांचे प्रभाग समिती क्र.३ वॉर्ड क्र.४२ बील नं. १०८३/१ चे एक १/२ घरगुती नळ कने. आकारणी रद्द करून आकारणी रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.३

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसारून विनंती अहवाल सादर करण्यात येतो की,श्री.अनंत गंगाधर दामले,जाधव मळा,बडोदा बॅक कॉलनी,बालिकाश्रम रोड,अहमदनगर येथील माझ्या मिळकतीमध्ये पाण्याचे एकच नळ कनेक्शन आहे.मात्र मला पाणीपट्टीचे दोन बिल येत असल्याने पाणीपट्टी बिल क्र.Z४२००००२१५ हे रद्द करणे बाबत अर्ज सादर केलेला आहे.

या बाबत वास्तविक परिस्थिती अशी की,वॉर्ड क्र.४२ बिल क्र.१०८३/१ मालमत्ता क्र. Z३४२०९५९५६ व नळ जोडणी क्र. Z४२००००२१५ या दोन्ही बिलावर श्री .अनंत गंगाधर दामले या नांवे नोंदी आहेत.बिल क्र१०८३/१ मालमत्ता क्र. Z३४२०९५९५६ या बिलावर पाणीपट्टी सह घरपट्टीची नोंद आहे व नळ जोडणी क्र. Z४२००००२१५या बिलावर फक्त पाणीपट्टीची नोंद करण्यात आलेली आहे.श्री.अनंत गंगाधर दामले यांनी पाण्याचे एकच नळ कनेक्शन असल्याने नळ जोडणी क्र. Z४२००००२१५ हे बिल रद्द करणे बाबत मागणी केलेली आहे.

उक्त अर्जाच्या अनुषंगाने या प्रभागाकडिल जा.क्र.३५३३ ि.२२/७/२०१९ जा.क्र.४१९१ दि.२२/०८/२०१९ व जा.क्र. ५६९० दि.१५/११/२०१९ अन्वये मा.प्रभाग अभियंता ,पाणी पुरवठा विभाग यांना सदर जागेची समक्ष स्थळ पाहणी करून किती नळ कनेक्शन आहे या बाबतचा अहवाल त्वरीत सादर करणे बाबत कळविण्यात आलेले आहे.

सदर पत्राच्या अनुषंगाने पाणी पुरवठा फिटर,पाणी पुरवठा विभाग यांनी दिनांक २०/११/२०१९ रोजी समक्ष जागेची पाहणी केली असता अर्धा इंचीचे एक नळ कनेक्शन आढळुन आलेले आहे,असा अहवाल सादर केलेला आहे.

अर्जदार श्री.अनंत गंगाधर दामले यांना दिनांक १७/६/१९ रोजीचा अर्ज ,पा.पु.फिटर यांचा दि.२०/११/२०१९ रोजीचा अहवाल व जा.क्र./सा.प्र.वि./पी.ए.१९७६ दि.३०/०१/२०१३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकार नुसार स्थापन केलेल्या गठीत समितीने सदर ठिकाणी दि.२६/१२/२०१९ रोजी समक्ष पाहणी केली असता १/२" चे एक नळ कनेक्शन आढळुन आलेले आहे.

त्यामुळे नळ जोडणी क्र. Z४२००००२१५ चे पाणीपट्टी बिल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १५२ अन्वये सन २०१९-२०२० ची पाणीपट्टी रक्कम रू.२४,०००/-त्यावर आकारलेली नोटीस फी व शास्तीची रक्कम कमी करणेस व नळ जोडणी क्र. Z४२००००२१५ पाणीपट्टी नोंद कायम स्वरूपी कमी करणेस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अभिप्राय असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावा मध्ये नुमुद केल्या प्रमाणे सदर वसुली वॉर्ड नें.४२ मिळकत रजिष्टर वरील नं १०८३/१ बाबत झोन नं.३ चे म्यु.पल.नळ फिटर यांच्या पहाणी अहवालानुसार असे दिसुन येते की,सदर मिळकतीस घरपट्टी + पाणीपट्टी १/२" नळकनेक्शन ची आकारणी करण्यात आलेली आहे.त्यास वेगळा बील नं.देण्यात आलेला आहे.परंतु सदर मिळकतीस फक्त १/२" इंच नळ कनेक्शन आकारणी करण्यात येत आहे. तरी सदर प्रस्तावा मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नियम १५२ अन्वये प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.३ यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर सहाय्यक कर निर्धारक अधिकारी यांचा अभिप्राय की,पाणी पुरवठा विभागाकडील पहाणी अहवालानुसार एकाच नळजोडाची नोंद असल्याने त्या नळजोडाचा कर भरणा हावू शकणान नाही.त्यामुळे नळजोडाची रक्कम मा.स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणे विषयी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री. अनंत गंगाधर दामले, रा. बालिकाश्रम रोड, अ.नगर यांचे प्रभाग समिती क्र.३ वॉर्ड क्र.४२ बील नं. १०८३/१ चे एक १/२ घरगुती नळ कने. आकारणी रद्द करून आकारणी रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.डॉ. सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री. अनंत गंगाधर दामले, रा. बालिकाश्रम रोड, अ.नगर यांचे प्रभाग समिती क्र.३ वॉर्ड क्र.४२ बील नं. १०८३/१ चे एक १/२ घरगुती नळ कने. आकारणी रद्द करून आकारणी रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार श्री. अनंत गंगाधर दामले, रा. बालिकाश्रम रोड, अ.नगर यांचे प्रभाग समिती क्र.३ वॉर्ड क्र.४२ बील नं. १०८३/१ चे एक १/२ घरगुती नळ कने. आकारणी रद्द करून आकारणी रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.डॉ. सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री. प्रकाश भागानगरे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- १०८ सोमवार दि.२५/१०/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभागासाठी लिक्वीड क्लोरीन गॅस सिलेंडर -९०० kg x ६० सिलेंडर जरूरीप्रमाणे खरेदीकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की,अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभागासाठी लिक्वीड क्लोरीन गॅस सिलेंडर - ९०० kg x ६० सिलेंडर खरेदीकामी दै.महाराष्ट्र निरोप्या दि.२४/०७/२०२१ चे वर्तमानपत्रात,अहमदनगर महानगरपालिका वेबसाईट व अहमदनगर महानगरपालिका नोटीस बोर्डवर नोटीस प्रसिध्द करुन तसेच बाजारात पूरवठादारांशी समक्ष संपर्क साधून दोन लिफाफे पध्दतीने कोटेशन दरपत्रके मागवीली असता मुदतीत -

१)श्री.स्वामी समर्थ एंटरप्राईजेस,मुंबई
२)ॲक्वा फलो इंजिनिअर्स,मुलुंड(प.),मुंबई
३)जी.एस.कमर्सिअल,मुंबई
४)रंग रसायन,पुणे

याप्रमाणे एकूण चार (४) कोटेशन दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

उपरोक्त प्राप्त चार कोटेशन दरपत्रकांपैकी श्री.स्वामी समर्थ एंटरप्राईजेस,मुंबई व ॲक्वा फलो इंजिनिअर्स,मुलूंड(प.),मुंबई या दोन कोटेशन दरपत्रकातील तांत्रिक लिफाफ्यातील अत्यावश्यक कागदपत्रांची पुर्तता न झाल्याने सदरची दरपत्रके अग्राहय असल्याने त्यांचे व्यापारी लिफाफे उघडण्यात आलेले नाहीत.उर्वरित दोन ग्राहय दरपत्रकांचे व्यापारी लिफाफे उघडण्यात आलेले असून ग्राहय कोटेशन दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र.१ - लिक्वीड क्लोरिन गॅस ९०० किलो सिलेंडर,BIS स्पेसिफिकेशन प्रमाणे रक्कम रुपये.१३,५००=०० + १८% जी.एस.टी.रक्कम रुपये.२,४३०=०० याप्रमाणे एकूण रक्कम रुपये.१५,९३०=०० / प्रती ९०० kg सिलेंडर हा दर जी.एस.कमर्सिअल कॉर्पोरेशन,मुंबई यांचा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम प्राप्त झालेला आहे.

स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दर धारक पूरवठादार जी.एस.कमर्सिअल कॉर्पोरेशन,मुंबई यांना दर निगोसिएशन करिता बोलावून दि.२३/०८/२०२१ रोजी झालेल्या मा.प्रशासकिय खरेदी समितीच्या बैठकीत कोटेशन दरपत्रकांच्या तुलनात्मक तक्त्यासह संपुर्ण प्रकरण अवलोकनार्थ तथा निर्णयास्तव ठेवण्यात आले असता दर निगोसिएशनवेळी स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दर धारक पुरवठादार जी.एस.कमर्सिअल कॉर्पोरेशन,मुंबइ्र हे समक्ष उपस्थित होते.सदरवेळी झालेल्या चर्चेनुसार पूरवठादार यांनी दरपत्रकामध्ये दिलेल्या दरामध्ये दर कमी करुन खालील तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दर दिलेला असून.पुरवठादार यांनी बैठकीत झालेल्या निर्णयाप्रमाणे लेखी संमतीपत्र दिलेले आहे.

| अ क्र | साहित्याचा तपशिल | परिमाण | कोटेशन दरपत्रकामध्ये नमुद लघुत्तम दर | दर वाटाघाटी नंतर दिलेला अंतिम दर | खरेदीकामी येणारा एकूण खर्च रक्कम रुपये. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | लिक्वीड क्लोरिन गॅस ९०० किलो सिलेंडर BIS स्पेसिफिकेशन प्रमाणे | ९०० kg x ६० सिलेंडर | रु.१३,५००=०० + १८ % GST रु.२,४३०=०० <br> रु.१५,९३०=०० / प्रती ९०० kg सिलेंडर | १३,२००=०० / प्रती ९०० kg सिलेंडर सर्व कर समाविष्ट | ७,९२,०००=०० |

मा.महाराष्ट्र शासन उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांकःभांखस - २०१४/प्र.क्र.८२/ भाग-III/उदयोग-४ दिनांक.१ डिसेंबर २०१६ मधील परिच्छेद क्र.४.४.३.१ मधील ब)दोन निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व अगोदर ठरलेली किंमत यामध्ये (-) २० टक्के ते (+) १० टक्के तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहील.या किंमत श्रेणीमध्ये (Price Band)किंमती न आल्यास फेर निविदा काढावी अशी तरतूद आहे.पुरवठादार यांनी दर निगोसिएशन नंतर कमी करुन दिलेला अंतिम दर हा सदर शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे प्राप्त झालेला आहे.

मुदतीत प्राप्त दरपत्रकातील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दर बाजारभावाशी पडताळून दर निगोसिएशनमध्ये कमी करुन दिलेले अंतिम दर योग्य असल्याने पुरवठादार यांनी दर निगोसिएशन नंतर दिलेल्या उपरोक्त तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद दरास,सदर दराने शहर पाणी पुरवठा विभागासाठी लिक्वीड क्लोरीन गॅस सिलेंडर - ९०० kg x ६० सिलेंडरत्यांचे कडून जरुरीप्रमाणे खरेदी करणेस व खरेदीकामी येणा-या रक्कम रुपये.७,९२,०००=००फक्त (अक्षरी रक्कम रुपये.सात लक्ष ब्यान्नव हजार) फक्तच्या खर्चास मंजुरी देणेबाबत तसेच प्रस्ताव मंजुरीनंतर करण्यात येणा-या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करण्यास मंजुरी देणेबाबत शिफारस मा.प्रशासकिय खरेदी समितीमार्फत करण्यात आलेली आहे.

तरी मा.प्रशासकिय खरेदी समितीने केलेल्या शिफारशी प्रमाणे पूरवठादार जी.एस.कमर्सिअल कॉर्पोरेशन,मुंबई यांनी दर निगोसिएशन नंतर दिलेल्या उपरोक्त तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद दरास,सदर दराने शहर पाणी पुरवठा विभागासाठी लिक्वीड क्लोरीन गॅस सिलेंडर ९०० kg x ६० सिलेंडर त्यांचेकडून जरुरीप्रमाणे खरेदी करणेस व खरेदीकामी येणा-या रक्कम रुपये.७,९२,०००=००फक्त (अक्षरी रक्कम रुपये.सात लक्ष ब्यान्नव हजार) फक्तच्या खर्चास मंजुरी देणेबाबत तसेच प्रस्ताव मंजुरीनंतर करण्यात येणा-या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करण्यास मंजुरी मिळावी हि विनंती.आदेशार्थ सविनय सादर./अ

येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर लेखापरिक्षक यांचा रजेवर

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.प्रशासकीय खरेदी समिती यांच्या शिफारशीनुसार व स्टोअर विभाग प्रमुख यांनी प्रस्तावीत केल्याप्रमाणे "अ" नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर सहा. आयुक्त (कर) यांची अभिप्राय की, प्रस्तावीत 'अ' प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.अति. आयुक्त यांची अभिप्राय की, प्रस्तावीत केल्यानुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभागासाठी लिक्वीड क्लोरीन गॅस सिलेंडर -९०० kg x ६० सिलेंडर जरूरीप्रमाणे खरेदीकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.शाम नळकांडे :-ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभागासाठी लिक्वीड क्लोरीन गॅस सिलेंडर -९०० kg x ६० सिलेंडर जरूरीप्रमाणे खरेदीकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये अवलोकन झाले आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभागासाठी लिक्वीड क्लोरीन गॅस सिलेंडर -९०० kg x ६० सिलेंडर जरूरीप्रमाणे खरेदीकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा.स्थायी समितीस अवलोकन झाले आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

सुचक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- १०९ सोमवार दि.२५/१०/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेशपात्र स्त्री कर्मचा-यांसाठी गणवेश व गणवेश कापड खरेदीकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये महितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग

**संदर्भ :-** फेर ई-निविदा क्र.2021_ANMC_644841_1

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की,अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेषपात्र स्त्री कर्मचा-यांसाठी स्त्री कर्मचारी गणवेष खरेदीकामी मा.महाराष्ट्र शासन उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/ उदयोग-४ मादाम कामारोड,हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,मुंबई-४०००३२दि.१/१२/२०१६अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची सुधारित नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र.४.१ अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन दै.सार्वमत दि.१९/०३/२०२१चे वर्तमानपत्रात संक्षिप्त जाहिरात तसेच **http:// mahatenders. gov.in** या वेबसाईटवर जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करुन ई-निविदा मागविल्या असता मुदतीत -

१)व्ही.के.एंटरप्राईजेस,ठाणे

२)क्रिश एंन्टरप्रायजेस,ठाणे

३)वर्षा ट्रेडींग कंपनी,अहमदनगर

याप्रमाणे एकूण तीन (३) निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

तीनही निविदाकार यांनी निविदेत नमुद दराचे स्त्री कर्मचारी गणवेष नमुने दाखल केलेले आहेत.

तत्कालिन अहमदनगर नगरपालिका प्रशासन व कामगार संघटना यांचे दरम्यान झालेल्या ॲवार्ड मधील मुददा क्र.९ - गणवेष व संरक्षक साधने यातील अ.क्र.१ - अन्वये स्त्री कर्मचारी गणवेष युनियनचे प्रतिनिधींशी चर्चा करुन खरेदी करावे.असे ठरले असल्याने निविदे सोबत प्राप्त स्त्री कर्मचारी गणवेष नमुने गणवेषपात्र स्त्री कर्मचारी प्रतिनिधी व युनियन प्रतिनिधी अहमदनगर महानगरपालिका यांना समक्ष दाखवून त्यांची पसंती घेणे आवश्यक आहे

प्राप्त निविदा दराचा तुलनात्मक तक्ता पाहता-अ.क्र.१ते ३,५,७व ९ ते १२ चे दर व्ही.के. एंटरप्राईजेस, ठाणे यांचे व अ.क्र.४,६ व ८चे दर क्रिश एंटरप्राईजेस,ठाणे यांचे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम प्राप्त झालेले असून दोन्हीही निविदाकांर यांना दर निगोसिएशनसाठी समक्ष उपस्थित राहणेबाबत कळविले असता लॉकडाऊन असल्याने दोन्हीही निविदाकार हे समक्ष उपस्थित राहु शकले नाहीत परंतू दोन्हीही निविदाकार यांनी दर निगोसिएशनबाबतचे पत्र ई-मेलद्वारे सादर केलेले असून निविदेमध्ये नमुद केलेले दर योग्य दिलेले असून सदर दरामध्ये दर कमी करण्यास असमर्थता दर्शवून निविदेमध्ये दिलेले दर मंजुर करणेबाबत विनंती केलेली आहे.मुदतीत प्राप्त निविदातील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दर बाजारभावाशी पडताळून दर निगोसिएशन मध्ये दिलेले अंतिम दर योग्य असल्याने पुरवठादार यांनी दर निगोसिएशन नंतर दिलेल्या दरास व प्राप्त गणवेष नमुने कामगार युनियन व कर्मचारी प्रतिनिधी यांना समक्ष दाखवून नमुना पसंती घेणेबाबत तसेच नमुना पसंतीनुसार सदर दराने स्त्री कर्मचारी गणवेष जरुरीप्रमाणे संबंधित निविदाकार यांचेकडून खरेदी करणेस व नामंजुर निविदाकार यांची निविदा बयाणा (EMD) रक्कम त्यांना परत करणेस तसेच निविदा मंजुरीनंतर

करण्यात येणा-या संविदेची माहिती महाराष्ट्र मनपा अधि.१९४९चे कलम७३(ड) अन्वये मा.स्थायीसमिती सभेपुढे माहितीस्तव सादर करण्यास मंजुरी देणेबाबत शिफारस मा.प्रशासकिय खरेदी समितीमार्फत करण्यात आलेली होती.

त्यानुषंगाने मा.अध्यक्ष,अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी निविदेसोबत प्राप्त झालेल्या स्त्री कर्मचारी गणवेष नमुन्यांची स्टोअर विभाग कार्यालयात स्त्री कर्मचारी प्रतिनिधींसह भेट देवून पडताळणी करुन पसंतीबाबत अहवाल सादर करणेबाबत वारंवार दुरध्वनीद्वारे संपर्क साधून तसेच जा.क्र.स्टोअर विभाग-३१७ दि.३०/०७/२०२१ अन्वये कळविले असता त्यांनी दि.१३/०८/२०२१ रोजी स्टोअर विभाग कार्यालयात युनियन पदाधिकारी व संबंधित पात्र महिला सफाई व चतुर्थ श्रेणी कर्मचारी प्रतिनिधींसह भेट देवून निविदेसोबत प्राप्त झालेल्या स्त्री कर्मचारी गणवेष नमुन्यांची पडताळणी केली असता क्रिश एंटरप्राईजेस,ठाणे यांचे नमुने पसंत केलेले आहेत.व पसंतीबाबतचा अहवाल दि.१३/०८/२०१९ चे पत्रान्वये सादर केलेला आहे.

जा.क्र.स्टोअर विभाग-८४ दि.०३/०५/२०२१ अन्वये गणवेषपात्र स्त्री कर्मचा-यांची गणवेष वर्णन व नावासह माहिती मागवून प्राप्त झालेल्या माहितीप्रमाणे स्त्री कर्मचारी गणवेष वाटप करावे लागतील स्टोअर विभागातील यापुर्वीचा खालीलप्रमाणे शिल्लक गणवेष साठा आहे.

| अ.क्र. | स्टोअर विभागाकडील यापुर्वीचा शिल्लक गणवेषाचा तपशिल | परिमाण |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १) | स्त्री सफाई कर्मचा-यांकरीता - ६ वारी रंगीत साडी,<br>कमीत कमी ५.५ मी.लांबीची ११६ सें.मी.रुंद,किनारपट्टी असलेली<br>प्रत्येकी ३ साडी रंग - काळा,लाल व जांभळा प्रत्येकी १ नग | ३० नग |
| २) | स्त्री सफाई कर्मचा-यांकरीता - ९ वारी रंगीत साडी,<br>कमीत कमी ८.३ मी.लांबीची ११६ सें.मी. रुंद,किनारपट्टी असलेली<br>प्रत्येकी २ साडी रंग - काळा व फिक्कट निळा प्रत्येकी १ नग | ६ नग |
| ३) | स्त्री सफाई कर्मचा-यांकरिता - नमुना पसंतीच्या रंगीत साडीवर 'मॅच'होणारा ब्लाऊजपीस रुंदी कमीत कमी ८९ सें.मी.,रंग - लाल<br>(प्रत्येकी २ मिटरचा १ पिस करुन) | १८ पीस x २ मीटर |
| ४) | स्त्री शिपाई कर्मचा-यांकरिता पुनम सुतामधील ६ वारी साडी कमीत कमी<br>५.५ मी.लांबीची ११६ सें.मी.रुंद. रंग - अबोली | ३६ नग |
| ५) | स्त्री शिपाई कर्मचा-यांकरिता - नमुना पसंतीच्या साडीवर 'मॅच'होणारा ब्लाऊज पीस रुंदी कमीत कमी ८९ सें.मी.<br>(प्रत्येकी २ मिटरचा १ पिस करुन) | १२ पीस x २ मीटर |
| ६) | दवाखान्यातील आया,दाया इ.स्त्री कर्मचा-यां करीता ६ वार सफेद रंगाची साडी,<br>कमीत कमी ५.५ मी.लांबीची ११६ सें.मी.रुंद,<br>२.१/२" निळी गर्द किनारपट्टी असलेली | ६ नग |
| ७) | दवाखान्यातील आया,दाया इ. स्त्री कर्मचा-यां करीता ९ वार सफेद रंगाची साडी,<br>कमीत कमी ८.३ मी.लांबीची ११६ सें.मी. रुंद,<br>२.१/२" निळी गर्द किनारपट्टी असलेली | २ नग |
| ८) | दवाखान्यातील आया,दाया इ.स्त्री कर्मचा-यां करीता ब्लाऊजपीस सफेद रंगाचा रुंदी कमीत कमी ८९ सें.मी.<br>(प्रत्येकी २ मिटरचा १ पिस करुन) | ३ पीस x २ मीटर |
| ९) | दवाखान्यातील स्त्री परिचारीका कर्मचा-यां करीता ६ वारी बदामी रंगाची वायल साडी - कमीत कमी ५.५ मी.लांबीची,<br>११६ सें.मी.रुंद असलेली. | ६ नग |
| १०) | दवाखान्यातील स्त्री परिचारीका कर्मचा-यां करीतानमुना पसंतीच्या बदामी रंगाची वायल साडीसाठी बदामी रंगाचा ब्लाऊजपीस<br>रुंदी कमीत कमी ८९ सें.मी (प्रत्येकी २ मिटरचा १ पिस करुन) | २ पीस x २ मीटर |

| | | |
|---|---|---|
| ११) | दवाखान्यातील स्त्री परिचारीका कर्मचा-यां करीता बदामी रंगाचा सलवार कुर्ता दोन ड्रेससाठी कापड. पन्हा ३६".<br>(प्रत्येकी ९ मिटरचा १ पिस करुन) | ४ पीस x ९ मीटर |
| १२) | दवाखान्यातील वैद्यकिय अधिकारी,लॅबटेक्निशियन, मिश्रक व स्त्री परिचारीका कर्मचा-यां करीता - दोन ॲप्रनसाठी पांढरे कापड पन्हा ५८"<br>(प्रत्येकी ४ मिटर) | ७ पीस x ४ मीटर |

वरील प्रमाणे स्टोअर विभागातील शिल्लक साठा विचारात घेवून पसंत केलेल्या गणवेष नमुन्यांच्या वाटाघाटीनंतर क्रिश एंटरप्राईजेस,ठाणे यांच्या दि.२६/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या अंतिम दरानुसार खरेदीकामी पुढीलप्रमाणे खर्च येणार आहे.

| **अ. क्र.** | **पसंत नमुन्याप्रमाणे गणवेषाचाचा तपशील** | **प्राप्त माहितीनुसार गणवेषपात्र स्त्री कर्मचारी संख्या x त्यांना देण्यात येणारी गणवेष संख्या** | **स्टोअर विभागातील शिल्लक साठा विचारात घेवून खरेदी करणे आवश्यक गणवेष संख्या** | **पसंत केलेल्या नमुन्याचा निगोसिएशन नंतर दिलेला अंतिम दर** | **पसंत केलेल्या नमुन्याच्या दराने येणारा एकुण खर्च रुपये.** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| १) | स्त्री सफाई कर्मचा-यांकरीता - ६ वारी रंगीत साडी,कमीत कमी ५.५ मी.लांबीची ११६ सें.मी.रुंद,किनारपट्टी असलेली प्रत्येकी ३ साडी<br>रंग - काळा,लाल व जांभळा प्रत्येकी १ नग | २८४ x ३ नग = ८५२ नग | ८२२ नग | ४६४=०० / प्रती १ नग | ३८१४०८=०० |
| २) | स्त्री सफाई कर्मचा-यांकरीता - ९ वारी रंगीत साडी,कमीत कमी ८.३ मी.लांबीची ११६ सें.मी. रुंद,किनारपट्टी असलेली प्रत्येकी २ साडी<br>रंग - काळा व फिक्कट निळा प्रत्येकी १ नग | ६६ x २ नग = १३२ नग | ११६ नग | ६६४=०० / प्रती १ नग | ७७०२४=०० |
| ३) | स्त्री सफाई कर्मचा-यांकरिता - नमुना पसंतीच्या रंगीत साडीवर 'मॅच'होणारा ब्लाऊजपीस रुंदी कमीत कमी ८९ सें.मी.,रंग - लाल<br>(प्रत्येकी २ मिटरचा १ पिस करुन) | ३५० x २ मीटर = ७०० मीटर | ३३२ x २ मीटर | ७९=०० /प्रती १ मीटर | ५२४५६=०० |
| ४) | स्त्री शिपाई कर्मचा-यांकरिता पुनम सुतामधील ६ वारी साडी कमीत कमी ५.५ मी.लांबीची ११६ सें.मी.रुंद.<br>रंग - अबोली | ४९ x ३ नग = १४७ नग | १११ नग | ४४९=०० / प्रती १ नग | ४९८३९=०० |
| ५) | स्त्री शिपाई कर्मचा-यांकरिता - नमुना पसंतीच्या साडीवर 'मॅच'होणारा ब्लाऊज पीस रुंदी कमीत कमी ८९ सें.मी.<br>(प्रत्येकी २ मिटरचा १ पिस करुन) | ४९ x २ मीटर = ९८ मीटर | ३७ x २ मीटर | ७९=०० /प्रती १मीटर | ५८४६=०० |
| ६) | दवाखान्यातील आया,दाया इ.स्त्री कर्मचा-यां करीता ६ वार सफेद रंगाची साडी, कमीत कमी ५.५ मी.लांबीची ११६ सें.मी.रुंद, २.१/२" निळी गर्द किनारपट्टी असलेली | ३२ x ३ नग = ९६ नग | ९० नग | ४९०=०० / प्रती १ नग | ४४१००=०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७) | दवाखान्यातील आया,दाया इ. स्त्री कर्मचा-यां करीता ९ वार सफेद रंगाची साडी,कमीत कमी ८.३ मी.लांबीची ११६ सें.मी. रुंद, २.१/२" निळी गर्द किनारपट्‌टी असलेली | २ x २ नग = ४ नग | २ नग | ६२५=०० / प्रती १ नग | १२५०=०० |
| ८) | दवाखान्यातील आया,दाया इ.स्त्री कर्मचा-यां करीता ब्लाऊजपीस सफेद रंगाचा रुंदी कमीत कमी ८९ सें.मी. (प्रत्येकी २ मिटरचा १ पिस करुन) | ३४ x २ मीटर = ६८ मीटर | ३१ x २ मीटर | ७९=०० / प्रती १ मीटर | ४८९८=०० |
| ९) | दवाखान्यातील स्त्री परिचारीका कर्मचा-यां करीता बदामी रंगाचा सलवार कुर्ता दोन ड्रेससाठी कापड. पन्हा ३६". (प्रत्येकी ९ मिटरचा १ पिस करुन) | २० x ९ मीटर = १८० मीटर | १६ x ९ मीटर | १२४=०० / प्रती १ मीटर | १७८५६=०० |
| १०) | दवाखान्यातील वैद्यकिय अधिकारी, लॅबटेक्निशियन,मिश्रक व स्त्री परिचारीका कर्मचा-यां करीता - दोन ॲप्रनसाठी पांढरे कापड पन्हा ५८" (प्रत्येकी ४ मिटर) | ३२ x ४ मीटर = १२८ मीटर | २५ x ४ मीटर | ३४०=०० / प्रती १ मीटर | ३४०००=०० |
| | | | | **एकूण रक्कम रुपये.** | **६६८६७७=००** |

तरी निविदाकार क्रिश एंटरप्राईजेस,ठाणे यांनी दि.०६/०८/२०२१ चे पत्रान्वये दर वाटाघाटीनंतर कमी करुन दिलेले (उपरोक्त तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद)दर मंजूरीस व सदर दराने अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन प्रतिनिधी व स्त्री कर्मचारी प्रतिनिधी यांनी समक्ष पसंत केलेल्या गणवेष नमुन्याप्रमाणे स्त्री कर्मचारी गणवेष खरेदीस व त्याकामी येणा-या रक्कम रुपये.६,६८,६७७=००फक्त(अक्षरी रक्कम रुपये.सहा लक्ष अडुसष्ठ हजार सहाशे सत्याहत्तर फक्त)खर्चास मंजुरी मिळावी तसेच निविदा मंजुरीनंतर करण्यात येणा-या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करण्यास मंजुरी मिळावी हि विनंती.आदेशार्थ सविनय सादर./अ

**अंदाजपत्रकिय तरतूद - सन.२०२१-२०२२**

**लेखाशिर्ष -** गणवेष खरेदी - तरतूद - रु.३५,००,०००=००

आतापर्यंत झालेला खर्च - रु.१७,९२,५००=००

प्रस्तावित खर्च - रु.६,६८,६७७=००

एकूण खर्च - रु.२४,६१,१७७=००

उपलब्ध शिल्लक - रु.१०,३८,८२३=००

प्रस्तावित बजेट रजिष्टर पा.नं. १/३ वर नोंद असे

येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, स्टोअर विभाग प्रमुख यांनी प्रस्तावीत केल्याप्रमाणे 'अ' नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर सहा.आयुक्त (कर) यांची अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा. अति. आयुक्त यांची अभिप्राय की, प्रस्तावीत केल्यानुसार मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेशपात्र स्त्री कर्मचा-यांसाठी गणवेश व गणवेश कापड खरेदीकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये महितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.शाम नळकांडे :-ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेशपात्र स्त्री कर्मचा-यांसाठी गणवेश व गणवेश कापड खरेदीकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये अवलोकन झाले आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेशपात्र स्त्री कर्मचा-यांसाठी गणवेश व गणवेश कापड खरेदीकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये मा.स्थायी समितीस अवलोकन झाले आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

सुचक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- ११० सोमवार दि.२५/१०/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेकरीता शव वाहिका (Hearse Van) खरेदी करणे कामी सन २०२१-२२ ई - निविदा क्र. T.ID ६७८७०० खरेदी कामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये महितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग

विषय- मा.स्थायी समितीच्या अवलोकनार्थ शव वाहिका (Hearse Van) खरेदी बाबत नस्ती सादर करणेकमी मंजुरी मिळणेबाबत

उपरोक्त संदर्भांकित विषयानुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिकेकरीता (Hearse Van) खरेदी करणेकामी प्रसिध्द जाहिर ई-निविदा सुचना क्र.०३ सन २०२१-२०२२ (T.ID-६७८७००) एक नग खरेदी करणेकामी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदे चितांमणी मोटर्स यांचे दर लघुत्तम आल्याने सदर प्रति वाहन आर.टी.ओ. पासिंग व एक वर्षाचे इन्शुरन्स सदर रक्कम १७,६०,०००/- रूपयास दरास व खर्चास मान्यतेकामी मा.आयुक्त यांची मंजुरी घेवुन घनकचरा व्यवस्थापन विभाग ज.क्र.८९ दिनांक १८/५/२०२१ रोजीचे कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. त्यानुसार सदर एजन्सीने कार्यारंभ आदेशानुसार एक नग शव वाहिका (Hearse Van) पुरवठा करून सदर वाहनांचे आर.टी.ओ. पासिंग व एक वर्षाचे इन्शुरन्स करून दिलेले आहे.

त्यानुसार सदरील खरेदी बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७३(ड) नुसार मा.स्थायी समितीस माहिती देणेकामी मा.स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सदरील नस्ती सादर करणेकामी मंजुरीस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे प्र.मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.उपायुक्त (कर) यांची अभिप्राय की, मा.स्थायी समितीकडे माहितीसाठी सादर करणेसाठी मान्यतेस्तव

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेकरीता शव वाहिका (Hearse Van) खरेदी करणे कामी सन २०२१-२२ ई - निविदा क्र. T.ID ६७८७०० खरेदी कामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये महितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.प्रकाश भागानगरे:- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.डॉ. सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेकरीता शव वाहिका (Hearse Van) खरेदी करणे कामी सन २०२१-२२ ई - निविदा क्र. T.ID ६७८७०० खरेदी कामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती स्थायी समितीस अवलोकन झाले आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेकरीता शव वाहिका (Hearse Van) खरेदी करणे कामी सन २०२१-२२ ई - निविदा क्र. T.ID ६७८७०० खरेदी कामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती स्थायी समितीस अवलोकन झाले आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. डॉ. सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री. प्रकाश भागानगरे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- १११ सोमवार दि.२५/१०/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेकरीता Truck Chassis Mounted Jetting मशिन वाहन खरेदी करणे कामी प्रसिध्द जाहिर Goverment e Marketplace (GeM) पोर्टल वरून खरेदी कामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये महितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग

विषय- मा.स्थायी समितीच्या अवलोकनार्थ Truck Chassis Mounted Jetting खरेदी बाबत नस्ती

मा.स्थायी समिती कडे अवलोकनार्थ सादर करणेकामी मंजुरी मिळणेबाबत

उपरोक्त संदर्भांकित विषयानुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिकेकरीता Truck Chassis Mounted Jetting खरेदी करणेकामी प्रसिध्द जाहिर Goverment e Marketplace (GeM) पोर्टल वरून Truck Chassis Mounted Jetting मशीन वाहन खरेदी करणेकामी Bid Number: GEM/२०२१/B/९७५९६६ निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेमध्ये SRN ENVIRO ENGINEERS, East Delhi यांचे दर लघुत्तम आल्याने सदर प्रति वाहन आर.टी. ओ. पासिंग व एक वर्षाचे इन्शुरन्स दर रक्कम रूपये १८,००,०००/- रूपयास दरास व खर्चास मान्यतेकामी मा.आयुक्त यांची मंजुरी घेवुन घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत कार्यारंभ आदेश देण्यांत आले होते. त्यानुसार सदर एजन्सीने कार्यारंभ आदेशानुसार एक नग Truck Chassis Mounted Jetting मशीन पुरवठा करून सदर वाहनांचे आर.टी.ओ. पासिंग व एक वर्षाचे इन्शुरन्स करून दिलेले आहे.

त्यानुसार सदरील खरेदी बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ७३ ड नुसार मा.स्थायी समितीस माहिती देणेकामी मा.स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सदरील नस्ती सादर करणेकामी मंजुरीस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे प्र.मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.उपायुक्त कर यांची अभिप्राय की, मा.स्थायी समितीला माहितीस्तव देणेकामी मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेकरीता Truck Chassis Mounted Jetting मशिन वाहन खरेदी करणे कामी प्रसिध्द जाहिर Goverment e Marketplace (GeM) पोर्टल वरून खरेदी कामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये महितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.प्रकाश भागानगरे:- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.डॉ. सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेकरीता Truck Chassis Mounted Jetting मशिन वाहन खरेदी करणे कामी प्रसिध्द जाहिर Goverment e Marketplace (GeM) पोर्टल वरून खरेदी कामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती मा.स्थायी समितीस अवलोकन झाले आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिकेकरीता Truck Chassis Mounted Jetting मशिन वाहन खरेदी करणे कामी प्रसिध्द जाहिर Goverment e Marketplace (GeM) पोर्टल वरून खरेदी कामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती मा.स्थायी समितीस अवलोकन झाले आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. डॉ. सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री. प्रकाश भागानगरे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- ११२ सोमवार दि.२५/१०/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे.दवाखाना व प्रसुती गृहाकरीता शहरातील इच्छुक व अनुभवी स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांचे मानधन वाढ निश्चित करून व्हिजीट बेसवर पॅनल शिपवर नेमणूक करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह विभाग

संदर्भ- १. स्थायी समिती ठराव क्र.६९दिनांक ०६/०२/२०१८ अन्वये पारीत ठराव

२. कै.बा.दवाखाना जा.क्र.५७ दि.१८/०४/२०१८ ने पॅनल नेमणूक आदेश

३. कै.बा.दवाखाना जा.क्र.४५ दि.२८/०४/२०२१ ने पॅनला मुदतवाढ आदेश

४. स्त्रीरोगतज्ञ पॅनलवरील डॉक्टरांचा मानधनवाढी बाबत दि.२०/०६/२०२१ चा विनंती अर्ज.

उपरोक्त विषयानुसार विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की,अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.देवाखाना व प्रसुती गृह हे १०० खाटांचे रूग्णालय असून २४ तास अविरत कार्यरत आहे.येथे दररोज साधारण ८० ते १०० रूग्ण बाह्यरूग्ण विभागामध्ये तपासणी करिता येत असतात तसेच दररोज साधारण ०८ते१० प्रसुती आवश्यकतेनुसार दरमहा साधारण १०० ते १५० इमर्जन्सीच्या सिझे रियन शस्त्रक्रिया व दररोज ५ ते ६ कुटुंब नियोजन शस्त्रक्रीया केल्या जातात. कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे दररोज होणा-या सिझेरियन शस्त्रक्रिया व कुटुंबनियोजन शस्त्रक्रियेकरिता स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांची आवश्यकता भासते.दवाखान्यामध्ये स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांची संख्या अपुरी असल्याने मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ६९ ठराव दिनांक ०६/०२/२०१८ ने जा.क्र.कै.बा.दे.दवाखाना ५७ दि.१८/०४/२०१८ अन्वये दि.०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०२१ अखेर तीन वर्षाकरीता स्त्रीरोगतज्ञांची पॅनलशिपवर प्रत्येक भेटीस (व्हिजीट फी ) रू.२००/- तसेच प्रत्येक सिझेरीयन शस्त्रक्रियेस दिवसा (सर्जन फी ) रू.२०००/- व नाईटला (१०.००Pm to ६ .००am) रू.३०००/- या प्रमाणे मानधनावर नेमणूक करण्यात आलेली असून सदरच्या पॅनलची मुदत दि.३१/०३/२०२१ रोजी संपुष्टात आल्याने दवाखान्याची स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरां अभावी गैरसोय होवू नये म्हणून सध्याच्या स्त्रीरोगतज्ञांच्या पॅनलला पुढील कालावधीकरीाि पॅनलची नेमणूक होई पर्यत संदर्भ क्र.३ ने मुदतवाढ आदेश देण्यात आलेला आहे.पुएील तीन वर्षाच्या कालावधीकरिता शहरातील इच्छुक स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांच्या पॅनलची नेमणुक करणे आवश्यक आहे.

तसेच पॅनलवरील स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांनी सध्याची महागाईचा व खाजगी रूग्णालयातील चार्जेसचा विचार करता सध्याच्या मानधनामध्ये वाढ करणे बाबत संदर्भ क्र.४ ने विनंती अर्ज दिलेलाआहे.सदर पॅनलवरील स्त्रीरोग डॉक्टरांच्या मानधन वाढीबाबत अर्जाचा विचार करता या कार्यालयाकडील प्रस्तावित वाढीचा तुलनात्मक तक्त्या सोबत जोडलेला आहे.

नुकतेच मा.स्थायी समिती सभा क्र.०२ विषय क्र.२७ दिनांक ०३/०६/२०२१ च्या पारीत ठरावानुसार कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथील पॅनलशीपवरील भुलतज्ञ डॉक्टरांच्या मानधनामध्ये वाढ करण्यात आलेली आहे.त्यामुळे भुलतज्ञ डॉक्टरांचे मानधन सध्याच्या प्रसुती सर्जन डॉक्टरांच्या मानधनापेक्षा जास्त झालेले आहे.प्रस्तावित सर्जन डॉक्टरांचे मानधन हे भुलतज्ञ डॉक्टरांपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

सदरची नेमणूक ही कुठल्याही प्रकारची स्थायी अथवा अस्थायी नेमणूक नसुन दवाखान्यामध्ये सिझेरीयन शस्त्रक्रियेस आवश्यकता भासल्यास त्यांना कॉल करून शस्त्रक्रियेनुसार फी अदा केली जाईल.तसेच पॅनलची नेमणूक केल्यांनता एखादा स्त्रीरोगतज्ञांनी पॅनलमध्ये नेमणूक करणेबाबत विनंती अर्ज केल्यास त्याच्या अर्जाचा विचार करून प्रस्ताव ठेवुन प्रशासकीय मंजुरी घेवून पॅनलमध्ये त्यांचा समाविष्ठ करण्यात येईल.सध्या महानगरपालिकेकडे २ कायमपदावरील स्त्रीरोग तज्ञ असल्याने तसेच त्यांचे रजेच्या काळात आणि दिवसेंदिवस
रूग्णांची संख्या वाढत असल्याने कायमस्वरूपी स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांचे पॅनल शस्त्रक्रियेसाठी व्हिजीट बेसीसवर उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे.सदरचे पॅनल नेमणे,त्यामध्ये नाव समाविष्ठ करणे/वगळणे,त्यांचे मानधन अदा करणे बाबत सर्व आवश्यक कार्यवाही कै.बा.दे.दवा.कार्यालया मार्फत करण्यात येणार आहे.

तरी दवाखान्याच्या रूग्णसेवेमध्ये स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरां अभावी गैरसोय होवू नये म्हणून सोबतच्या यादीतील शहरातील इच्छुक अनुभवी स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांची त्यांनी मागणी केलेल्या मानधनवाढीचा विचार करून प्रत्येक भेटीस (व्हिजीट फी) रू.३००/-तसेच प्रत्येक सिझेरीयन शस्त्रक्रीयेस दिवसा (सर्जन फी )रू.४०००/-व नाईटला (१०.००Pm to ६.००am) रू.५०००/-व सिझेरीयन शस्त्रक्रिया (२ रा व ४था शनिवार,सर्व रविवार ,पब्लीक हॉलीडे)रू.४५००/- याप्रमाणे मानधनवाढ निश्चित करून आदेश निर्गमीत दिनांकापासुन तीन वर्षाकरिता पॅनल शीपवर करारबध्द नेमणूक करणे कामी प्रस्ताव स्थायी समितीपुढे निर्णयास्तव व मंजूरीस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे प्र. वैद्यकीय अधिक्षक, कै.बा.दे.वा. व सुतिका गृह यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) "अ" प्रमाणे स्थायी समितीकडे शिफारसी करिता सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मुलेअ / मुलेप

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,कै.बा.दे.दवाखाना यांचे प्रस्तावात नमुद केलेले दरवाढ हे खाजगी दवाखान्याशी तुलना केलेले दिसुन येते.यात कै.बा.दे.दवाखाना महानगरपालिका मोफत सेवा देणेचे काम करत असल्याने पॅनलशिपवर नियुक्ती करताना महागाई दराप्रमाणे तीन वर्षाचे सरासरी साधारण ३० ते ५० टक्के दरवाढ करणे संयुक्तीक राहील तथापी अंतीमनिर्णय आपले स्तवारवर घेणे आदशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेसाठी सादर

यावरमा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मुलेप यांच्या अभिप्रायानुसार उचित कार्यवाही करावी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

**-**-**

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :-_अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे.दवाखाना व प्रसुती गृहाकरीता शहरातील इच्छुक व अनुभवी स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांचे मानधन वाढ निश्चित करून व्हिजीट बेसवर पॅनल शिपवर नेमणूक करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.सचिन शिंदे :- ,कै.बा.दे.दवाखाना यांचे प्रस्तावात नमुद केलेले दर हे खाजगी दवाखान्याशी मध्ये असलेल्या दरानुसार आहेत.कै.बा.दे.दवाखाना महानगरपालिका गोरगरीबांकरीता मोफत सेवा देणेचे काम करत असल्याने पॅनलशिपवर डॉक्टरांना ४० टक्के मानधनामध्ये वाढ करण्यात यावी.

मा.श्री.शाम नळकांडे :- ४० टक्के मानधनामध्ये वाढ देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे.दवाखाना व प्रसुती गृहाकरीता शहरातील इच्छुक व अनुभवी स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांचे मानधन ४० टक्के वाढ निश्चित करून व्हिजीट बेसवर पॅनल शिपवर नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे.दवाखाना व प्रसुती गृहाकरीता शहरातील इच्छुक व अनुभवी स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांचे मानधनामध्ये ४० टक्के वाढ निश्चित करून तीन वर्षाकरिता पॅनल शीपवर व्हिजीट बेसवर करारबध्द नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- ११३ सोमवार दि.२५/१०/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका संचलीत कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथे वैद्यकीय व नीमवैद्यकीय कर्मचारी वर्ग बाह्य यंत्रणेमार्फत (आउटसोर्सीग व्दारे ) अभिकर्त्यांमार्फत पुरविणेकामी ई - निविदा प्रक्रियेव्दारे / संस्था नियुक्ती करणे कामी प्राप्त दरास मान्यता देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह विभाग

विषय- अहमदनगर महानगरपालिका संचलीत कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे वैद्यकीय व नीमवैद्यकीय कर्मचारी वर्ग बाहय यंत्रणेमार्फत (आउट्सोर्सिंग द्वारे) अभिकर्त्यामार्फत पुरविणेकामी ई- निविदा प्रक्रियेद्वारे अभिकर्ता / संस्था नियुक्त करणे कामी मागणविण्यात आलेल्या फेरनिविदे बाबत

संदर्भ- १.फेरनिविदा क्र.ANMC/ ७००५७९/२०२१-२०२२

२.जेट सर्व्हीसेझ,पुणे यांचे दिनांक ०२/०९/२०२१ चे पत्र

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार रिपोट्र करण्यात येतो की,अहमदनगर महानगरपालिका संचलीत कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे वैद्यकीय व निमवैद्यकीय कर्मचारी वर्ग बाह्य यंत्रणेमार्फत (आउटसोर्सीग व्दारे ) अभिकर्त्यामार्फत पुरविणेकामी ई - निविदा प्रक्रियेव्दारे अभिकर्ता /संस्था नियुक्त करणे कामी करिता मा.आयुक्त साहेब यांच्या दिनांक ०३/०६/२०२१ च्या मंजुरीने फेर निविदा क्र. ANMC/ ७००५७९/२०२१-२०२२ प्रसिध्द करण्यात आलेली होती.सदर निविदेचा सक्रीनशॅट घेतला असता जेट सर्व्हीसेझा,पुणे हया संस्थेची १ निविदा प्राप्त झालेली आहे. सदर कामाच्या निविदेस अल्प प्रतिसाद असल्याने व फेरनिविदा असल्याने मा.उपायुक्त (कर) यांच्या दिनांक ११/०८/२०२१ रोजीच्या मान्यतेने सदर फेर निविदेचे तांत्रिक लिफाफे उघडण्यात आले.

सदर प्राप्त निविदेच्या तांत्रिक लिफाफयातील कागदपत्रांची पडताळणीचा तुलनात्मक तक्ता मा.प्रशासकीय छाननी समितीपुढे दि.२७/०८/२०२१ रोजी ठैवला असता जेट सर्व्हीसेझा,पुणे यांची निविदा पात्र असून व्यापारी लिफाफे उघडण्यास तांत्रिक छाननी समितीने शिफारस केलेली आहे.त्या अनुशंगाने दि.२७/०८/२०२१ रोजी व्यापारी लिफाफे उघउझयात आले.

त्यानुसार जेट सर्व्हीसेझ,पुणे यांच्या व्यापारी लिफाफयामध्ये खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक पात्रता | आवश्यक पद संख्या | प्रति एक पदाकरिता दरमहा दर रू. | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.एम.ओ.वैद्यकीय अधिकारी | M.B.B.S<br>B.A.M.S.<br>B.H.M.S | ०३ | ६०,०००/-(**M.B.B.S)**<br>२८,०००/- **(B.A.M.S)**<br>**(B.H.M.S)** | १२ महिने |
| २ | स्टाफनर्स (परिचारीका) | R.G.N.M | ०८ | २०,०००/- | |
| ३ | सहाय्यक परिचारीका (ए.एन.एम) | R.G.N.M | ०७ | १७,०००/- | |
| ४ | लॅब टेक्निशियन | Bsc,DMLT | ०२ | १७,०००/- | |
| ५ | आया/दाया | अनुभवी | १० | १५५००/- | |
| ६ | स्पीपर | अनुभवी | ०५ | १५५००/- | |
| ७ | वॉचमन/सुरक्षा रक्षक | प्रशिक्षीत | ०४ | १७०००/- | |

वरील प्रमाणे प्राप्त दरांबाबत मा. उपायुक्त कर यांचे दिनांक ३१/०८/२०२१चे मान्यतेने मे. जेट सर्व्हीसेझ, पुणे यांना कै.बा.दे. दवाखाना जा.क्र. ३६९ दिनांक ०१/०९/२०२१ ने दिनांक ०२/०९/२०२१ रोजी मा.उपायुक्त कर यांचे समक्ष वाटाघाटी करिता बोलाविण्यात आले. सदर बैठकीमध्ये आम्ही टेंडरमध्ये दिलेले दर हे कमीत कमी असुन अत्यंत वाजवी व योग्य आहेत तरी आम्हाला अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे वैद्यकीय व नीमवैद्यकीय कर्मचारी वर्ग पुरविणेच्या कामाची संधी द्यावी ही विनंती असे म्हणणे मांडून त्याप्रमाणे संदर्भ क्र.२ ने पत्र या कार्यालयाकडे सादर केलेले आहे.

तरी कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे वैद्यकीय व नीमवैद्यकीय कर्मचारी वर्ग बाहय यंत्रणेमार्फत (आउटसोर्सींग व्दारे ) अभिकर्त्यामार्फत पुरविणेकामी जेट सर्व्हीसेझ, पुणे या संस्थेचे वरील तक्त्यात नमुद दरांस मान्यतेस्तव व सदर कामी येणारा खर्च सन २०२१-२०२२ कार्यालयीन खर्च (बाहय यंत्रणा) या लेखाशिर्षामधुन करणेस प्रस्ताव मंजुरीस मा.स्थायी समिती समोर सादर करणेकामी प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर./अ

येणेप्रमाणे मुख्य लिपिक यांना अहवाल असे.

यावर प्र. वैद्यकीय अधिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे आउटसोर्सीग अभिकर्ता जेट सर्व्हीसेझ, पुणे यांचे दरपत्रकास मंजुरीस मा.स्थायी समितीचे विषय घेणेस मान्यतेस तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेसाठी

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, मुलेअ / मुलेप तपासून घेणे

यावर मुख्यलेखापरिक्षक यांची अभिप्राय की,प्रस्तावीत केलेनुसार मा.स्थायी समितीकडे पाठविणेस कार्यवाहीस्तव

यावर मा.उपायुक्त कर यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका संचलीत कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथे वैद्यकीय व नीमवैद्यकीय कर्मचारी वर्ग बाह्य यंत्रणेमार्फत (आउटसोर्सीग व्दारे ) अभिकर्त्यांमार्फत पुरविणेकामी ई - निविदा प्रक्रियेव्दारे / संस्था नियुक्ती करणे कामी प्राप्त दरास मान्यता देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री. सागर बोरूडे :- प्र. वैद्यकीय अधिक्षक डॉ. राजूरकर माहिती सांगा.

प्र.वैद्यकीय अधिक्षक डॉ. राजूरकर :- कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे वैद्यकीय व निमवैद्यकीय कर्मचारी वर्ग कमी आहे. हया दवाखानामार्फत सेवा देणे अत्यंत महत्वाचे असल्याने वै.अधिकारी परिचारीका , लॅब टॅक्नीशीयन महानगरपालिकामार्फत भरणे गरजेचे आहे. परंतु मा.शासनाने स्टॅम्पींग पॅटर्नला मान्यता न दिल्याने बाह्य यंत्रणेमार्फत (आउटसोर्सीग व्दारे)अभिकर्त्यामार्फत पुरविणेकामी ई-निविदा प्रक्रियेव्दारे अभिकर्ता /संस्था नियुक्त करणे कामी करिता ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार जेट सर्व्हीसेझा,पुणे हया संस्थेची निविदा प्राप्त झालेली आहे. या कामी प्राप्त दरास मान्यता देणे याकरिता मा.स्थायी समिती समोर सादर केला आहे.

मा.श्री. रविंद्र बारस्कर :- यांना पगार कोणत्या निधी मधून देणार आहात.

प्र.वैद्यकीय अधिक्षक डॉ. राजूरकर :- मनपा फंडातून करणार आहेत.परंतु इतर तात्काळ उपलब्ध होणा-या निधीतुन करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- मनपा फंडातून पगार सहा-सहा महिने होत नाहीत. असा अनुभव आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- एखादया निधीमधुन यांचे पगार करता येणार नाही का ? या प्रस्तावात तीन डॉक्टर व परिचारिकाचा विषय आहे त्यांचे पगार वेळेवर न झाल्यासह ते काम सोडुन जातील महानगरपालिकेची बदनामी होईल त्यामुळे १४ व्या वित्त आयोग निधीमधुन देयक अदा करण्याची कार्यवाही करावी.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- १४ व्या वित्त आयोगनिधीतुन पगार करता येतील.

मा.श्री. समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.या कामा करीता १४ व्या वित्त आयोंगातनु किंवा यावरील व्याजापोटी मिळणा-या रकमेतुन करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- १४ व्या वित्त आयोगातुन खर्च करण्यात यावा. सदरची सेवा हि अत्यावश्यक सेवा असल्याने सदरील कामाचे देयक दरमहा अदा करण्यात यावे. ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका संचलीत कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथे वैद्यकीय व नीमवैद्यकीय कर्मचारी वर्ग बाह्य यंत्रणेमार्फत (आउटसोर्सीग व्दारे ) अभिकर्त्यांमार्फत पुरविणेकामी ई - निविदा क्र. ANMC/ ७००५७९/२०२१-२०२२ प्रक्रियेव्दारे जेट सर्व्हीसेझ, पुणे नियुक्ती करणे कामी प्राप्त दरास मान्यता देण्यात येत आहे. सदरची सेवा हि अत्यावश्यक सेवा असल्याने सदरील कामाचे देयक दरमहा अदा करण्यात यावे. सदरचा खर्च १४ व्या वित्त आयोगातून अथवा त्या रकमेच्या व्याजातुन भागविण्यास ही सभा मान्याता देत आहे.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका संचलीत कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथे वैद्यकीय व नीमवैद्यकीय कर्मचारी वर्ग बाह्य यंत्रणेमार्फत (आउटसोर्सीग व्दारे ) अभिकर्त्यांमार्फत पुरविणेकामी ई - निविदा क्र. ANMC/ ७००५७९/२०२१-२०२२ प्रक्रियेव्दारे जेट सर्व्हीसेझ, पुणे नियुक्ती करणे कामी प्राप्त दरास मान्यता देण्यात येत आहे. सदरची सेवा हि अत्यावश्यक सेवा असल्याने सदरील कामाचे देयक दरमहा अदा करण्यात यावे. सदरचा खर्च १४ व्या वित्त आयोगातून अथवा त्या रकमेच्या व्याजातुन भागविण्यास ही सभा मान्याता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- ११४ सोमवार दि.२५/१०/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारतीच्या अवारातील १०X२० (१८.५९ चौ.मी.) फुटाची मोकळी जागा लिलावधारक श्री. निखील मिनीनाथ दडगे यांना अटी व शर्ती नुसार भाडेतत्वावर देणेबाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग

संदर्भ- दि.२३/७/२०२१ रोजीचा जाहिर लिलाव

उपरोक्त विषयान्वये विनंतीपुर्वक रिपोर्ट सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारतीच्या अवारातील स.नं.१००पैकी १०x२० (१८.५९ चौ.मी.)फुटाची मोकळी जागा दरमहा भाडे रू.३१५०/-(कराविरहित)व अनामत रक्कम रूपये १६००००/-घेउन १० वर्षे कराराने भाडयाने देणेबाबत दि.१५/७/२०२१रोजी दैनिक सार्वमत या वर्तमानपत्रात प्रसिध्दी देउन दि.२३/७/२०२१ रोजी मा.उपायुक्त (कर), मार्केटविभागप्रमुख व लिलावधारक यांच्या समक्ष जाहिर लिलाव घेण्यात आला असुन लिलावामध्ये वरील खुल्या जागेकरिता खालीलतक्त्या दर्शविल्यानुसार लिलावधारकांनी बोली बोललेले आहेत.

| अ. क्र. | लिलावधारकांचे नाव | सरकारी किंमत दरमहा भाडे | लिलाव बोली बोललेली किंमत | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. सागर गणेश येमुल | रू.३१५०/- (कराविरहित) | ३३००,३६०० | १६००००/- |
| २ | श्री. अंकित राजेंद्र झुजुर | रू.३१५०/- (कराविरहित) | ३४०० | १६००००/- |
| ३ | श्री. निखिल मिनीनाथ दडगे | रू.३१५०/- (कराविरहित) | ३७०० | १६००००/- |

वरीलप्रमाणे लिलाव पुकारता श्री. निखिल मिनीनाथ दडगे, अहमदनगर यांनी मनपाने निश्चित केलेल्या सरकारी किंमत रू.३१५०/- (कराविरहित) किंमती पेक्षा सर्वात जास्त दरमहा भाडे रक्कम रू.३७००/- (कराविरहित) व अनामत रक्कम रू.१६००००/- यास मागणी केली त्यापेक्षा कोणीही जास्त बोली न बोलल्यामुळे वरील लिलाव सदर रक्कमेस श्री. निखिल मिनीनाथ दडगे अहमदनगर यांचे नांवे तीन वार लिलाव कायम करून लिलाव प्रक्रिया पुर्ण केली आहे.

तरी अहमदनगर महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारतीच्या अवारातील स.नं.१०० पैकी १०x२० (१८.५९ चौ.मी.) फुटाची मोकळी जागा दरमहा भाडे रू.३७००/- (कराविरहित) व अनामत रक्कम रूपये १६००००/- घेउन १० वर्षे कराराने भाडयाने देणेबाबत मा.दुय्यम निबंधक जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांच्याकडेस लिलावाच्या व नेहमीच्या अटी व शर्ती नुसार १५ दिवसाच्या आत अनामत रक्कम रू. १६०००/- मार्केट विभागात रोखीने भरणा करून स्वखर्चाने करारनामा नोंदणीकृत करून इकडेस सादर करावा असे श्री. निखिल मिनीनाथ दडगे, अहमदनगर यांस कळविणेस रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे प्र.मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केल्याप्रमाणे अनामत रक्कम रू.१६००००/- भरणा करून करारनामा करण्यास आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, चर्चा करा, चर्चा केल्याप्रमाणे फेरसादर करावे.

यावर मा. अति.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर प्र.मार्केट विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, फेरसादर , उपरोक्त विषयान्वये विनंतीपुर्वक रिपोर्ट फेरसादर करण्यात येतो की, दि.२७/८/२०२१ रोजी मा.अति.आयुक्त सो. यांच्याशी समक्ष झालेल्या चर्चानुसार खालीलप्रमाणे फेरसादर करण्यात येत आहे. **अ)** मा.जिल्हाधिकारी अहमदनगर मा.आयुक्त अहमदनगर महानगरपालिका व मा.सहाय्यक जिल्हा निबंधक (वर्ग-१) तथा मुंद्रांक जिल्हाधिकारी मा.उपायुक्त (कर), मा.सहा. नगररचनाकार , मार्केट विभाग प्रमुख यांचे समक्ष मा. त्रिसदस्यीय समितीच्या दि.१०/०३/२०२१ रोजी झालेल्या बैठकीत जी.आर. नुसार मा. सहाय्यक जिल्हानिबंधक (वर्ग-१) तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी प्रमाणित करून दिलेले वार्षिक भाडे हे मनपाच्या सध्याच्या भाडयापेक्षा कमी येत आहे त्यामुळे मनपाचे नुकसान होईल तरी मा.शासनाचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ ब दि.१३ सप्टेंबर २०१९ चे जी.आर. नुसार भाडे निश्चिती करण्याची आवश्यकता नाही फक्त नव्याने बांधण्यात येणा-या शॉपींग सेंटरचे भाडे दि.१३ सप्टेंबर २०१९ चे जी.आर. नुसार ठरविण्यात यावेत खुल्या जागा बाबत मनपाने आपल्यास्तरावर निर्णय घेण्यात यावा. असा तोंडी आदेश देउन सुचित केलेले आहे.

**ब)** मा.सहाय्यक जिल्हा निबंधक (वर्ग-१) तथा मुंद्रांक जिल्हाधिकारी यांनी विषयांकित जागेचे रू.२०९२/- इतके दरमहा भाडे जा.क्र.१५५१ दि.१०/२/२०२१ अन्वये प्रमाणित केले होते तसेच मा. सहाय्यक संचालक नगररचनाकार मनपा यांनी विषयांकित जागेचे रू.३१५०/- इतके दरमहा भाडे मा.आयुक्त सो यांचे दि.५/६/२०२१ रोजीच्या आदेशान्वये प्रमाणित केले होते.सदरचे मनपाने निश्चित केलेले भाडे हे मा.सहाय्यक जिल्हा निबंधक (वर्ग -१ ) तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या भाडयापेक्षा जास्तीचे असल्याने मनपाच्या उत्पन्नात वाढ होईल.

क)महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ ब नुसार महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता एक वर्षाहुन अधिक अशा किोणत्याही कालावधीसाठी अशच मंजूरी घेवून भाडेपट्टयाने देता येईल अशि तरतुद आहे.

तरी अहमदनगर महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारतीच्या आवरातील स.नं.१०० पैकी१०x२०(१८.५९चौ.मी.) फुटाची मोकळी जागा श्री.निखिल मिनीनाथ दडगे अहमदनगर यांना दरमहा भाडे रू.३७००/-(कराविरहीत) व अनामत रक्कम रू.१६००००/- घेवून १० वर्ष कराराने लिलावाच्या व नेहमीच्या अटी व शर्तीनुसार भाडयाने देणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवणेस रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर. /-अ

येणे प्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७९(अ) मध्ये महानगरपालिका मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता एकवेळी जास्तीत जास्त बारा महिन्याचा कालावधीसाठी पट्टयाने देता येईल अशी तरतुद आहे.तरी "अ" बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, "अ" प्रमाणे

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारतीच्या अवारातील १०X२० (१८.५९ चौ.मी.) फुटाची मोकळी जागा लिलावधारक श्री. निखील मिनीनाथ दडगे यांना अटी व शर्ती नुसार भाडेतत्वावर देणेबाबत ऑफिस रिपोर्ट

मा.श्री. समद खान :- ऑफिस रिपार्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. सागर बोरूडे :- ऑफिस रिपार्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारतीच्या आवरातील स.नं.१०० पैकी१०x२०(१८.५९चौ.मी.) फुटाची मोकळी जागा लिलावधारक श्री.निखिल मिनीनाथ दडगे अहमदनगर यांना दरमहा भाडे कराविरहीत व अनामत घेवून १० वर्ष कराराने व नेहमीच्या अटी व शर्तीनुसार भाडेतत्वावर देणेबाबत ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारतीच्या आवरातील स.नं.१०० पैकी१०x२०(१८.५९चौ.मी.) फुटाची मोकळी जागा लिलावधारक श्री.निखिल मिनीनाथ दडगे अहमदनगर यांना दरमहा भाडे रक्कम कराविरहीत व अनामत रक्कम घेवून १० वर्ष कराराने अटी व शर्तीनुसार जागा भाडेतत्वावर देण्यास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री. सागर बोरूडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- ११५ सोमवार दि.२५/१०/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर येथील नालेगांव स.नं. २४६ पैकी नाका चौकाचे बाजुच्या संरक्षण भिंतीच्या आतील बाजुची रस्त्यालगतची मनपाच्या मालकीची १५x २० फुट क्षेत्राची खुली जागा लिलावधारक श्री. स्वप्निल दिपक गडाख यांना अटी व शर्ती नुसार भाडेतत्वावर देणेबाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग

उपरोक्त विषयान्वये विनंतीपुर्वक रिपोर्ट सादर करण्यात येतो की,अहमदनगर येथील नालेगांव स.नं.२४६ पैकी नेप्ती नाका चौकाचे बाजुच्या सरंक्षक भिंतीच्या आतील हॉटेल शिवलगत बाजुची रस्त्यालगतची मनपाच्या मालकीची १५x२० फुट क्षेत्राची खुली जागा दरमहा भाडे रू.२०००/- (कराविरहीत) व अनामत रक्कम रू.१०००००/-घेवनू १० वर्ष कराराने भाडेतत्वावर जाहिर लिलावाने देणेबाबत मा.आयुक्त साहेब यांनी दि.२४/०८/२०२१ रोजी मान्यता दिल्यानुसार स्पर्धात्मक दृष्टया दराचा लाभ मिळणेकामी जाहिर लिलावाची नोटीस दैनिक सार्वमत या वर्तमान पत्रात प्रसिध्दी देवून दि. २१/९/२०२१ रोजी मा.उपायुक्त (कर) , मार्केट विभाग प्रमुख व लिलावधारक याच्या समक्ष जाहिर लिलाव घेण्यात आला असुन लिलावामध्ये वरील खुल्या जागेकरिता खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार लिलावधारकांनी बोली बोललेले आहेत.

| अ. क्र. | लिलावधारकांचे नाव | सरकारी किंमत दरमहा भाडे | लिलाव बोली बोललेली किंमत | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. भाउसाहेब अर्जुन बांगर | रू.२०००/- (कराविरहित) | २२००/-,२४००/- | रू.१०००००/- |
| २ | श्री. राकेश बलराज गुंडू | रू.२०००/- (कराविरहित) | २३००/- | रू.१०००००/ |
| ३ | श्री. स्वप्निल दिपक गडाख | रू.२०००/- (कराविरहित) | २६००/- | रू.१०००००/ |

वरीलप्रमाणे लिलाव पुकारता श्री. स्वप्निल दिपक गडाख, अहमदनगर यांनी मनपाने निश्चित केलेल्या सरकारी किंमत रू.२०००/- (कराविरहित) किंमती पेक्षा सर्वात जास्त दरमहा भाडे रक्कम रू.२६००/- (कराविरहित) व अनामत रक्कम रू. १०००००/- यास मागणी केली त्यापेक्षा कोणीही जास्त बोली न बोलल्यामुळे वरील लिलाव सदर रक्कमेस श्री. स्वप्निल दिपक गडाख, अहमदनगर यांचे नांवे तीन वार लिलाव कायम करून लिलाव प्रक्रिया पुर्ण केली आहे.

तरी अहमदनगर येथील नालेगांव स.नं. २४६ पैकी नेप्ती नाका चौक्‌ाचे बाजुच्या सरंक्षक भिंतीच्या आतील हॉटेल शिवलगत बाजुची रस्त्यालगतची मनपाच्या मालकीची १५x२० = २७.८८ चौ.मी. क्षेत्राची खुली जागा दरमहा भाडे रू.२६००/- (कराविरहीत) व अनामत रक्कम रू.१०००००/-घेवनू १० वर्ष कराराने लिलावाच्या व नेहमीच्या अटी व शर्तीनुसार श्री. स्वप्निल दिपक गडाख , अहमदनगर यांस भाडेतत्वावर देणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे निर्णयास्तव ठेवणेस रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर./अ

येणेप्रमाणे प्र.मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा. सहाय्यक आयुक्त साहेब यांचा रजेवर

यावर मा.उपायुक्त (कर) यांची अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्येसाठी सादर

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर येथील नालेगांव स.नं. २४६ पैकी नाका चौकाचे बाजुच्या संरक्षण भिंतीच्या आतील बाजुची रस्त्यालगतची मनपाच्या मालकीची १५x २० फुट क्षेत्राची खुली जागा लिलावधारक श्री. स्वप्निल दिपक गडाख यांना अटी व शर्ती नुसार भाडेतत्वावर देणेबाबत ऑफिस रिपोर्ट

मा.श्री. समद खान :- ऑफिस रिपार्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. सागर बोरूडे :- ऑफिस रिपार्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर येथील नालेगांव स.नं. २४६ पैकी नेप्ती नाका चौक्ाचे बाजुच्या सरंक्षक भिंतीच्या आतील हॉटेल शिवलगत बाजुची रस्त्यालगतची मनपाच्या मालकीची १५x२० = २७.८८ चौ.मी. क्षेत्राची खुली जागा दरमहा भाडे रक्कम (कराविरहीत) व अनामत रक्कम घेवनू १० वर्ष कराराने लिलावाच्या व नेहमीच्या अटी व शर्तीनुसार श्री. स्वप्निल दिपक गडाख , अहमदनगर यांस भाडेतत्वावर देणेबाबत ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर येथील नालेगांव स.नं. २४६ पैकी नेप्ती नाका चौक्ाचे बाजुच्या सरंक्षक भिंतीच्या आतील हॉटेल शिवलगत बाजुची रस्त्यालगतची मनपाच्या मालकीची १५x२० = २७.८८ चौ.मी. क्षेत्राची खुली जागा दरमहा भाडे रक्कम (कराविरहीत) व अनामत रक्कम घेवनू १० वर्ष कराराने अटी व शर्तीनुसार लिलावधारक श्री. स्वप्निल दिपक गडाख , अहमदनगर यांस जागा भाडेतत्वावर देण्यास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री. सागर बोरूडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- ११६ सोमवार दि.२५/१०/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर येथील नालेगांव स.नं. २४६ पैकी नाका चौकाचे बाजुच्या संरक्षण भिंतीच्या आतील बाजुची रस्त्यालगतची मनपाच्या मालकीची १५x २० फुट क्षेत्राची खुली जागा लिलावधारक श्री. शिवदास विठ्ठल वांढेकर यांना अटी व शर्ती नुसार भाडेतत्वावर देणेबाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग

उपरोक्त विषयान्वये विनंतीपुर्वक रिपोर्ट सादर करण्यात येतो की,अहमदनगर येथील नालेगांव स.नं.२४६ पैकी नेप्ती नाका चौकाचे बाजुच्या सरंक्षक भिंतीच्या आतील हॉटेल शिवलगत बाजुची रस्त्यालगतची मनपाच्या मालकीची १५x२० फुट क्षेत्राची खुली जागा दरमहा भाडे रू.२०००/- (कराविरहीत) व अनामत रक्कम रू.१०००००/-घेवनू १० वर्ष कराराने भाडेतत्वावर जाहिर लिलावाने देणेबाबत मा.आयुक्त साहेब यांनी दि.२४/०८/२०२१ रोजी मान्यता दिल्यानुसार स्पर्धात्मक दृष्टया दराचा लाभ मिळणेकामी जाहिर लिलावाची नोटीस दैनिक सार्वमत या वर्तमान पत्रात प्रसिध्दी देवून दि. २१/९/२०२१ रोजी मा.उपायुक्त (कर) , मार्केट विभाग प्रमुख व लिलावधारक याच्या समक्ष जाहिर लिलाव घेण्यात आला असुन लिलावामध्ये वरील खुल्या जागेकरिता खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार लिलावधारकांनी बोली बोललेले आहेत.

| अ. क्र. | लिलावधारकांचे नाव | सरकारी किंमत दरमहा भाडे | लिलाव बोली बोललेली किंमत | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. उमेश राजकुमार कटारिया | रू.२०००/- (कराविरहित) | २१००/-, २३००/- | रू.१०००००/- |
| २ | श्री. सुशांत राजेंद्र शिंदे | रू.२०००/- (कराविरहित) | २२००/-, २४००/- | रू.१०००००/ |
| ३ | श्री. शिवदास विठ्ठल वांढेकर | रू.२०००/- (कराविरहित) | २५००/- | रू.१०००००/ |

वरीलप्रमाणे लिलाव पुकारता श्री. शिवदास विठ्ठल वांढेकर अहमदनगर यांनी मनपाने निश्चित केलेल्या सरकारी किंमत रू.२०००/- (कराविरहित) किंमती पेक्षा सर्वात जास्त दरमहा भाडे रक्कम रू.२५००/- (कराविरहित) व अनामत रक्कम रू. १०००००/- यास मागणी केली त्यापेक्षा कोणीही जास्त बोली न बोलल्यामुळे वरील लिलाव सदर रक्कमेस श्री. शिवदास विठ्ठल वांढेकर अहमदनगर यांचे नांवे तीन वार लिलाव कायम करून लिलाव प्रक्रिया पुर्ण केली आहे.

तरी अहमदनगर येथील नालेगांव स.नं. २४६ पैकी नेप्ती नाका चौक्ाचे बाजुच्या सरंक्षक भिंतीच्या आतील हॉटेल शिवलगत बाजुची रस्त्यालगतची मनपाच्या मालकीची १५x२० = २७.८८ चौ.मी. क्षेत्राची खुली जागा दरमहा भाडे रू.२५००/- (कराविरहीत) व अनामत रक्कम रू.१०००००/-घेवनू १० वर्ष कराराने लिलावाच्या व नेहमीच्या अटी व शर्तीनुसार श्री. शिवदास विठ्ठल वांढेकर , अहमदनगर यांस भाडेतत्वावर देणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे निर्णयास्तव ठेवणेस रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर./अ

येणेप्रमाणे प्र.मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा. सहाय्यक आयुक्त साहेब यांचा रजेवर

यावर मा.उपायुक्त (कर) यांची अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेसाठी मा.स्थायी समिती कडे सादर करणेस मान्यता मिळावी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर येथील नालेगांव स.नं. २४६ पैकी नाका चौकाचे बाजुच्या संरक्षण भिंतीच्या आतील बाजुची रस्त्यालगतची मनपाच्या मालकीची १५x २० फुट क्षेत्राची खुली जागा लिलावधारक श्री. शिवदास विठ्ठल वांढेकर यांना अटी व शर्ती नुसार भाडेतत्वावर देणेबाबत ऑफिस रिपोर्ट

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपार्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. सागर बोरूडे :- ऑफिस रिपार्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर येथील नालेगांव स.नं. २४६ पैकी नेप्ती नाका चौक्‍ाचे बाजुच्या सरंक्षक भिंतीच्या आतील हॉटेल शिवलगत बाजुची रस्त्यालगतची मनपाच्या मालकीची १५x२० = २७.८८ चौ.मी. क्षेत्राची खुली जागा दरमहा भाडे रक्कम (कराविरहीत) व अनामत रक्कम घेवनू १० वर्ष कराराने लिलावाच्या व नेहमीच्या अटी व शर्तीनुसार श्री. शिवदास विठ्ठल वांढेकर , अहमदनगर यांस भाडेतत्वावर देणेबाबत ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिका नालेगाव येथील स.नं. २४६ पैकी नेप्ती नाका चौक्‍ाचे बाजुच्या सरंक्षक भिंतीच्या आतील हॉटेल शिवलगत बाजुची रस्त्यालगतची मनपाच्या मालकीची १५x२० = २७.८८ चौ.मी. क्षेत्राची खुली जागा दरमहा भाडे रक्कम (कराविरहीत) व अनामत रक्कम घेवनू १० वर्ष कराराने अटी व शर्तीनुसार लिलावधारक श्री. शिवदास विठ्ठल वांढेकर , अहमदनगर यांस जागा भाडेतत्वावर देण्यास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री. सागर बोरूडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**
**(ऑनलाईन झुम ॲपद्वारे)**

विषय क्रमांक- ११७ सोमवार दि.२५/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय :- बांधकाम विभाग व अग्निशमन विभागाचे सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

प्रस्तावाचा मजकूर :- अहमदनगर महानगरपालिका अर्थ विभाग

संदर्भ- १. बांधकाम विभागाचा प्रस्ताव दि.०१/१०/२०२१ चा प्रस्ताव
२. अग्निशमन विभागचा दि.०६/१०/२०२१ चा प्रस्ताव

उपरोक्त विषयाचे संदर्भिंकित प्रस्तावानुसार सादर करणेत येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०२१-२०२२ चे मंजूर अंदाजपत्रकातील खर्चाचे अनुदानात वाढ / घट करणेबाबत विविध विभागांकडून प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. अर्थ विभागाकडे विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करून व संबंधित विभाग प्रमुखांची बैठक घेउन पुनर्विनियोजन अंदाजपत्रकाबाबत मा.उपायुक्त (सा.प्र.) यांचेशी चर्चा केली. चर्चेअंती सन २०२१-२०२२ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०३ व अनुसुची "ड" मधील ७ मधील २ (२) (अ) (ब) (क) अन्वये रकमा कमी करणे किंवा बदली करणे नुसार प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त नियमानुसार स्थायी समितीस सरकारी वर्षात कोणत्याही वेळी -

(अ) अर्थसंकल्पीय अनुदानाची रक्कम कमी करता येईल.

(ब) अर्थसंकल्पीय अनुदानातील कोणतीही रक्कम एका गौण शीर्षातून दुस-या गौण शीर्षात किंवा एका गौण शीर्षाखालील दुय्यक शीर्षातून दुस-या गौण शीर्षाखालील दुय्यम शीर्षात बदली करण्यास मंजुरी देता येईल.

(क) गौण शीर्षाखालील पाच हजार रूपयांपेक्षा अधिक असेल अशी कोणतीही रक्कम, एका दुय्यम शीर्षातुन दुस-या दुय्यम शीर्षात किंवा एका प्राथमिक घटकातून दुस-या प्राथमिक घटकात बदली करण्यास मंजुरी देता येईल. अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०३ नुसार "रकमा कमी करणे किंवा बदली करणे" या तरतुदीनुसार "कोणत्याही अर्थसंकल्पीय शिर्षात कमी करावयाच्या रकमा नियमानुसार कमी केल्या पाहिजेत आणि एका अर्थसंकल्पीय शिर्षातुन दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षातंर्गत बदली करावयाच्या रकमा नियमानुसार बदली केल्या पाहिजेत" अशी तरतुद असल्याने प्रकरण ७ मधील २ (२) मधील (अ) (ब) व (क) नुसार सन २०२१-२०२२ चे पुनर्विनियोजित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी सोबत जोडलेले सन २०२१-२०२२ चे पुनर्विनियोजित अंदाजपत्रक मंजुरीस्तव मा.स्थायी समिती समोर ठेवणे नियमानुसार योग्य राहील. कृपया आदेशार्थ सादर./अ

येणेप्रमाणे मुख्य लेखाधिकारी यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांची अभिप्राय की, मुलेअ यांचे अभिप्रायानुसार मा.स्थायी समिती समोर सादर करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, "अ" नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

०००

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चा नमुना क्रमांक १० नियम ३० (३) पहा
सन २०२१-२०२२ चे सादर केलेले पुनर्विनियोजनाचे विवरणपत्र

| | या शिर्षातून | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान, गौण व तपशील वार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान २०२१-२२ | २८ सप्टेंबर २१ अखरेचा खर्च | उपलब्ध शिल्लक (प्रस्तावीत कमी करावयाची रक्कम ) | (४-६) सुधारित तरतुद | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | -६ | ७ | ८ |
| १ | बांधकाम विभाग | मनपा सभागृह नुतनीकरण | ४०.०० | ० | ३०.०० | १०.०० | बांधकाम विभागाचा दि.०१/१०/२०२१ चा प्रस्ताव |
| | | पुल बांधणे व दुरूस्ती | २०.०० | ० | १५.०० | ५.०० | बांधकाम विभागाचा दि.०१/१०/२०२१ चा प्रस्ताव |
| | | प्रकल्प अहवाल तयार करणे /PMC | ३०.०० | ० | २०.०० | १०.०० | बांधकाम विभागाचा दि.०१/१०/२०२१ चा प्रस्ताव |
| | | वॉर्ड विकास निधी | ५०.०० | ३०.९७ | १०.०० | ४०.०० | बांधकाम विभागाचा दि.०१/१०/२०२१ चा प्रस्ताव |
| | | नवीन इमारती | १०.०० | ० | ५.०० | ५.०० | बांधकाम विभागाचा दि.०१/१०/२०२१ चा प्रस्ताव |
| | | स्मशानभूमी सुधारणा व नविन स्मशानभुमी | २०.०० | ० | १५.०० | ५.०० | बांधकाम विभागाचा दि.०१/१०/२०२१ चा प्रस्ताव |
| | | पुतळे बसविणे | ८०.०० | ० | ३०.०० | ५०.०० | बांधकाम विभागाचा दि.०१/१०/२०२१ चा प्रस्ताव |
| | | थकीत देयके | २२१.०० | ९८.८७ | ४३.०० | १७८.०० | बांधकाम विभागाचा दि.०१/१०/२०२१ चा प्रस्ताव |
| | | मनपा कर्मचारी घरकुल योजना | ५१.०० | ० | ४०.०० | ११.०० | बांधकाम विभागाचा दि.०१/१०/२०२१ चा प्रस्ताव |
| | | सावेडी गावठाण येथे शॉपींग कॉप्लेकस बांधणे | ५००.०० | ० | ४५०.०० | ५०.०० | बांधकाम विभागाचा दि.०१/१०/२०२१ चा प्रस्ताव |
| | | महापौर शहर विकास निधी | २००.०० | ४६.०० | १००.०० | १००.०० | बांधकाम विभागाचा दि.०१/१०/२०२१ चा प्रस्ताव |
| | अग्निशमन विभाग | नवीन वाहने खरेदी | १०५.०० | ० | ६१.२० | ४३.८० | अग्निशमन विभागाचा दि.०६/१०/२०२१ चा प्रस्ताव |
| | | **एकुण कमी करावयाची रक्कम** | | | **८१९.२०** | | |

| | या शिर्षात | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान, गौण व तपशीलवार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान २०२१-२२ | २८ सप्टेंबर २१ अखरेचा खर्च | प्रस्तावीत वाढीची रक्कम | अभ्रिपाय (११+१३) सुधारित तरतुद | अभिप्राय |
| ९ | १० | क | १२ | १३ | १४ | १५- | १६ |
| १ | बांधकाम विभाग | नवीन रस्ते विकसित करणे | २०५.०० | ०.०० | ७५८.०० | ९६३.०० | बांधकाम विभागाचा दि.०१/१०/२०२१ चा प्रस्ताव |
| २ | अग्निशमन विभाग | महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान | ० | ० | ६१.२० | ६१.२० | अग्निशमन विभागाचा दि.०६/१०/२०२१ |
| | | **एकुण वाढ करावयाची रक्कम** | | | **८१९.२०** | | |

येणेप्रमाणे मुख्यलेखाधिकारी यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- बांधकाम विभाग व अग्निशमन विभागाचे सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.प्रकाश भागानगरे:- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.शाम नळकांडे :- बांधकाम विभागातील प्रस्तावित कमी करावयाची रक्कम त्या त्या लेखाशिर्षाला कमी पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.समद खान :- महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियाना अंतर्गत (जिल्हा नियोजन समिती/ जिल्हास्तर) प्राप्त निधी मनपा फंड या मधून महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अनुदान या लेखाशिर्षावर वर्ग करण्यात याव्यात.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावातील बांधकाम विभागातील प्रस्तावित कमी करावयाची रक्कम त्या त्या लेखाशिर्षाला कमी पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे. अग्निशमन विभागाचे महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियाना अंतर्गत (जिल्हा नियोजन समिती/ जिल्हास्तर) प्राप्त निधी मनपा फंड या मधून महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अनुदान या लेखाशिर्षावर वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे. लेखा विभागाकडून बांधकाम विभाग व अग्निशमन विभागाकरीता सन २०२१-२०२२ चे पुनर्विनियोजित अंदाजपत्रकास हि सभा मान्यता देत आहे.

**<u>ठराव</u>** :- ऑफिस रिपोर्ट नुसार सादर करण्यात आलेले बांधकाम विभागातील प्रस्तावित कमी करावयाची रक्कम त्या त्या लेखाशिर्षाला कमी पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे. अग्निशमन विभागाचे महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियाना अंतर्गत (जिल्हा नियोजन समिती/ जिल्हास्तर) प्राप्त निधी मनपा फंड या मधून महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अनुदान या लेखाशिर्षावर वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे. लेखा विभागाकडून नमूद तक्त्यानुसार बांधकाम विभाग व अग्निशमन विभागाकरीता सन २०२१-२०२२ चे चे पुनर्विनियोजित अंदाजपत्रक मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री. समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- ११८ सोमवार दि.२५/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय :- घनकचरा विभाग व पाणीपुरवठा विभागाचे सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका अर्थ विभाग

संदर्भ- १. घचकचरा विभागाचा प्रस्ताव दि.१४/१०/२०२१ चा प्रस्ताव

२. पाणीपुरवठा विभागाचा दि.१२/१०/२०२१ चा प्रस्ताव

उपरोक्त विषयाचे संदर्भिंकित प्रस्तावानुसार सादर करणेत येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०२१-२०२२ चे मंजूर अंदाजपत्रकातील खर्चाचे अनुदानात वाढ / घट करणेबाबत विविध विभागांकडून प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. अर्थ विभागाकडे विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करून व संबंधित विभाग प्रमुखांची बैठक घेउन पुनर्विनियोजन अंदाजपत्रकाबाबत मा.उपायुक्त (कर) यांचेशी चर्चा केली. चर्चेअंती सन २०२१-२०२२ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०३ व अनुसुची "ड" मधील ७ मधील २ (२) (अ) (ब) (क) अन्वये रकमा कमी करणे किंवा बदली करणे नुसार प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त नियमानुसार स्थायी समितीस सरकारी वर्षात कोणत्याही वेळी -

(अ) अर्थसंकल्पीय अनुदानाची रक्कम कमी करता येईल.

(ब) अर्थसंकल्पीय अनुदानातील कोणतीही रक्कम एका गौण शीर्षातून दुस-या गौण शीर्षात किंवा एका गौण शीर्षाखालील दुय्यक शीर्षातून दुस-या गौण शीर्षाखालील दुय्यम शीर्षात बदली करण्यास मंजुरी देता येईल.

(क) गौण शीर्षाखालील पाच हजार रूपयांपेक्षा अधिक असेल अशी कोणतीही रक्कम, एका दुय्यम शीर्षातुन दुस-या दुय्यम शीर्षात किंवा एका प्राथमिक घटकातून दुस-या प्राथमिक घटकात बदली करण्यास मंजुरी देता येईल. अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०३ नुसार "रकमा कमी करणे किंवा बदली करणे" या तरतुदीनुसार "कोणत्याही अर्थसंकल्पीय शिर्षात कमी करावयाच्या रकमा नियमानुसार कमी केल्या पाहिजेत आणि एका अर्थसंकल्पीय शिर्षातुन दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षातंर्गत बदली करावयाच्या रकमा नियमानुसार बदली केल्या पाहिजेत" अशी तरतुद असल्याने प्रकरण ७ मधील २ (२) मधील (अ) (ब) व (क) नुसार सन २०२१-२०२२ चे पुनर्विनियोजित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी सोबत जोडलेले सन २०२१-२०२२ चे पुनर्विनियोजित अंदाजपत्रक मंजुरीस्तव मा.स्थायी समिती समोर ठेवणे नियमानुसार योग्य राहील. कृपया आदेशार्थ सादर./अ

येणेप्रमाणे मुख्य लेखाधिकारी यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांची अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, शिक्षण विभागाचा प्रस्ताव समावेश करून व प्रस्तावीत केल्यानुसार सन २०२१-२०२२ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रक मंजुरीस्तव मा.स्थायी समिती समोर ठेवणे करीता मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

०००

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चा नमुना क्रमांक १० नियम ३० (३) पहा

सन २०२१-२०२२ चे सादर केलेले पुनर्विनियोजनाचे विवरणपत्र

| | या शिर्षातून | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान, गौण व तपशीलवार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान २०२१-२२ | २० ऑक्टोंबर २१ अखरेचा खर्च | उपलब्ध शिल्लक (प्रस्तावीत कमी करावयाची रक्कम ) | (४-६) सुधारित तरतुद | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | -६ | ७ | ८ |
| १ | पाणी पुरवठा विभाग | महाराष्ट्र राज्य सुवर्ण नगरोत्थान महाभियान अनुदान (जिल्हास्तर) राबविणेबाबत घरकुल योजनेतंर्गत संजयनगर व नालेगांव पाणी पुरवठा योजना | ३०.०० | ० | २८.०० | २.०० | पाणीपुरवठा विभागाचा प्रस्ताव |
| २ | घनकचरा | घनकचरा विल्हेवाट व प्रक्रिया अनुदान | ८३३.०० | ० | ८२८.०० | ५.०० | घनकचरा विभागाचा प्रस्ताव |
| | | **एकुण कमी करावयाची रक्कम** | | | **८५६.००** | | |

--०००--

| | या शिर्षात | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान, गौण व तपशीलवार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान २०२१-२२ | २०ऑक्टो. २१ अखरेचा खर्च | प्रस्तावीत वाढीची रक्कम | अभ्रिपाय (११+१३) सुधारित तरतुद | अभिप्राय |
| ९ | १० | क | १२ | १३ | १४ | १५- | १६ |
| १ | पाणीपुरवठा विभाग | केडगाव वाढीव पाईप लाईन टाकणे | ०.०० | ०.०० | २८.०० | -२८.०० | पाणी पुरवठा विभागाचा प्रस्ताव |
| २ | घनकचरा विभाग | १२ वा / १३ वा /१४ वा वित्त आयोग | १०००० | | ८२८.०० | -१०८२८.०० | घनकचरा विभागाचा प्रस्ताव |
| | | **एकुण वाढ करावयाची रक्कम** | | | **८५६.००** | | |

येणेप्रमाणे मुख्यलेखाधिकारी यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- घनकचरा विभाग व पाणीपुरवठा विभागाचे सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.प्रकाश भागानगरे:- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.शाम नळकांडे :- घनकचरा व्यवस्थापन विभागाअंर्तगत सन २०२१-२२ चे खर्चाचे मुळ अंदाजपत्रक मधील लेखाशिर्षक १२ वा / १३ वा वित्त आयोग अनुदान १४ व्या वित्त आयोग लेखाशिर्षकामधील तरतुदी मध्ये वाढ करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

मा.श्री.समद खान :- महाराष्ट्र राज्य सुवर्ण नगरोत्थान महाअभियान अनुदान (जिल्हास्तर) राबविणे बाबत घरकुल योजनेअंतर्गत संजयनगर व नालेगांव पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षका मध्ये केलेली तरतुद रक्कम रूपये २८ लक्ष "केडगांव वाढीव पाईप लाईन टाकणे" या लेखाशिर्षामध्ये टाकणेस व "केडगांव वाढीव पाईप लाईन टाकणे" हे लेखाशिर्ष पुर्न:जिवित करणेस मान्यता देण्यात येत आहे.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावातील घनकचरा व्यवस्थापन विभागाअंर्तगत सन २०२१-२२ चे खर्चाचे मुळ अंदाजपत्रक मधील लेखाशिर्षक १२ वा / १३ वा वित्त आयोग अनुदान १४ व्या वित्त आयोग लेखाशिर्षकामधील तरतुदी मध्ये वाढ करण्यास ही सभा मान्यता देत आहे. महाराष्ट्र राज्य सुवर्ण नगरोत्थान महाअभियान अनुदान (जिल्हास्तर) राबविणे बाबत घरकुल योजनेअंतर्गत संजयनगर व नालेगांव पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षका मध्ये केलेली तरतुद रक्कम रूपये २८ लक्ष "केडगांव वाढीव पाईप लाईन टाकणे" या लेखाशिर्षामध्ये टाकणेस व "केडगांव वाढीव पाईप लाईन टाकणे" हे लेखाशिर्ष पुर्न:जिवित करणेस मान्यता देण्यात येत आहे. लेखा विभागाकडून घनकचरा व्यवस्थापन विभाग व पाणी पुरवठा विभागाकरीता सन २०२१-२०२२ चे पुनर्विनियोजित अंदाजपत्रक मंजूर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार सादर करण्यात आलेले घनकचरा व्यवस्थापन विभागाअंर्तगत सन २०२१-२२ चे खर्चाचे मुळ अंदाजपत्रक मधील लेखाशिर्षक १२ वा / १३ वा वित्त आयोग अनुदान १४ व्या वित्त आयोग लेखाशिर्षकामधील तरतुदी मध्ये वाढ करण्यास ही सभा मान्यता देत आहे. महाराष्ट्र राज्य सुवर्ण नगरोत्थान महाअभियान अनुदान (जिल्हास्तर) राबविणे बाबत घरकुल योजनेअंतर्गत संजयनगर व नालेगांव पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षका मध्ये केलेली तरतुद रक्कम रूपये २८ लक्ष "केडगांव वाढीव पाईप लाईन टाकणे" या लेखाशिर्षामध्ये टाकणेस व "केडगांव वाढीव पाईप लाईन टाकणे" हे लेखाशिर्ष पुर्न:जिवित करणेस मान्यता देण्यात येत आहे. लेखा विभागाकडून नमूद तक्त्यानुसार घनकचरा व्यवस्थापन विभाग व पाणी पुरवठा विभागाकरीता सन २०२१-२०२२ चे पुनर्विनियोजित अंदाजपत्रक मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री. समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८

विषय क्रमांक- ११९ सोमवार दि.२५/१०/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीच्या नोंदी अदयावत करणे करीता कंत्राटी पध्दतीने तहसिलदार/नायब तहसिलदार/अव्वलकारकुन पैकी एक महसूल व दोन भुमापक यांची नेमणूक करणेसाठी जाहिर निविदा मागविणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका नगररचना विभाग

उपरोक्त विषयाबाबत सादर करणेत येते की, यापुर्वी श्री. एस.बी.शिंदे, स्थावर मिळकत व्यवस्थापक पथक प्रमुख यांची स्थायी समिती ठराव क्र.८१ दि.९/२/२०२१ अन्वये दिनांक ७/१/२०२१ ते ६/१२/२०२१ या ११ महिन्यांच्या कालावधी करीता जमीन मालक यांचेकडून ताबे पावती करून घेणे / पंचनामे करून त्यावर स्वाक्षरी करणे. तसेच आवश्यक असणा-या मिळकतीचे ७/१२ ,फेरफार , खरेदीखत, सुची क्रमांक-२ मिळकत पत्रिका इत्यादी कागदपत्रे संबंधीत खात्याकडे समक्ष पथका मार्फत पाठपुरावा तसेच उडडाणपुलांचे भुसंपादनाचे कामकाज करणे इत्यादी कामाकरीता श्री. शिंदे , से.नि. तहसिलदार व श्री. पठाण भूमापक व इतर कर्मचारी यांची नेमणूक करणेत आली होती.

श्री. एस.बी. शिंदे, से.नि. तहसिलदार पथक प्रमुख यांचे दिनांक ७/४/२०२१ रोजी कोवीड या आजारोने निधन झालेले आहे.

तथापी अदयाप अहमदनगर महानगरपालिकेच्या मालमत्ते बाबत नोंदी करणे बाकी आहे.त्यातील काही कामास जास्त कालावधी लागणार आहे.तसेच मालमत्ते बाबत मा.न्यायालयात दावे प्रलंबित असून त्याबाबत वेळोवेळी न्यायालयाशी पाठपुरावा करावा लागतो.तसेच भूमी अभिलेख खात्याकडे महत्वाच्या मिळकतींबाबत अपील प्रलंबीत आहेत.तलाठी यांचे कडेस नोंदी प्रलंबित असलेने पाठपुरावा करेण आवश्यक आहे.सदरच्या पथकातील कर्मचारी यांनी माहे एप्रिल २०२१ पासून ते आजपावेतो उड्डाणपुलाचे संदर्भातील कामकाज केलेले आहे.तसेच भुमाप यांनी सुमारे २५ ओपनस्पेसच्या हद्दी निश्चीत करणे,विकास आराखडयातील रस्त्यांची आखणी करून देणे अतिक्रमणा बाबत खुण करून देणे इत्यादी कामे केलेली आहेत.तसेच पंपिंग स्टेशन ते अमरधाम कल्याण रोड या ३० मीटर डी.पी.रस्त्याचे भूसंपादन करणे कामी कार्यवाही चालू आहे.

तरी उर्वरित शिल्लक कामे पुर्ण करणेसाठी पुन्हा जाहिर निविदा मागवून कंत्राटी पध्दतीने नेमणुका करणे आवश्यक आहे.त्यासाठी स्थानिक दोन वर्तमान पत्रात जाहिर निविदा मागवून पुर्वी प्रमाणे ११ महिने कालावधी करीता अंदाजे रक्कम रूपये आठ लाख खर्च अपेक्षित आहे.कंत्राटी पध्दतीने सदर नेमणूक कणे कामी मंजूर करणे योग्य होईल सबब सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती अहमदनगर महानगरपलिका यांचे कडेस मंजूरीसाठी सादर करणे योग्य होईल तसेच सोबत जाहिर निविदा मसुदा मान्येतेसाठी सादर करीत आहे.

येणे प्रमाणे सहाय्यक संचालक नगर रचना यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,१.उदयोग उर्जा कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक २०२१/प्र.क्र.८ निंाक ७ मे २०२१ शासन निर्णया प्रमाणे कार्यवाही करावी.

२.सा.बा.विभागाचे शासन निर्णय दिनांक २७/९/२०१८ मधील परि.क्र.१.१ प्रमाणे जाहिरातीचा स्तर नमुद केला असल्याने त्याप्रमाणेकार्यवाही करून प्रस्तावीत अ नुसार कार्यवाहीस्तव.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीच्या नोंदी अदयावत करणे करीता कंत्राटी पध्दतीने तहसिलदार/नायब तहसिलदार/अव्वलकारकुन पैकी एक महसूल व दोन भुमापक यांनी नेमणूक करणेसाठी जाहिर निविदा मागविणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीच्या नोंदी अदयावत करणे करीता कंत्राटी पध्दतीने तहसिलदार/नायब तहसिलदार/अव्वलकारकुन पैकी एक महसूल व दोन भुमापक यांची नेमणूक करणेसाठी जाहिर निविदा मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीच्या नोंदी अदयावत करणे करीता कंत्राटी पध्दतीने तहसिलदार/नायब तहसिलदार/अव्वलकारकुन पैकी एक महसूल व दोन भुमापक यांनी नेमणूक करणेसाठी जाहिर निविदा मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- १२० सोमवार दि.२५/१०/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** गटर दुरूस्ती सन २०२१-२२ करीता फेर ई - निविदा क्र.२ ई - निविदा क्र.७११०३९ महानगरपालिकेच्या गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता विर्षीक दर निविदा मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट.(प्रभाग समिती क्र.१ व ३)

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

विषय- गटर दुरूस्ती सन २०२१-२०२२ करीता फेर ई-निविदा क्रमांक २ सुचना क्र.३८७ ई- निविदा क्र.७७११०३९ महानगरपालिकेच्या गटर /ड्रेनेज/ चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक दर मागविणेबाबतच्या निविदेच्या मंजुरीबाबत (प्रभाग क्र.०१ ते ०३)

उपरोक्त विषयाबाबत खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकीय मान्यता :- मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांची दि.२२/६/२०२१

२.ई-निविदा क्र.७११०३९ सन २०२१-२०२२ दि.०६/०८/२०२१

३.निविदा विक्री कालावधी :- दि.०६/०८/२०२१ ते १२/०८/२०२१

४.निविदा स्विकारणेची तारीख - दि. ०६/०८/२०२१ ते १२/०८/२०२१

५.निविदा उघडणेचा तारीख - १७/०८/२०२१

६.कामाची मुदत - ०४ महिने

७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील: दि.२४/०८/२०२१ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार

| ई-निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदे मध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| फेर - ई निविदा सुचना क्र.३८७ ७११०३९ सन २०२१-२२ | फेर ई-निविदा क्र.२ ई निविदा सुचना क्र.३८७ ई-निविदा क्र.७७११०३९ महानगरपालिकेच्या गटर /ड्रेनेज/ चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक दर मागविणे (प्रभाग क्र.१ ते ३ ) | ३०,००,०००/- | श्री. निकेतन शिवाजी लोटके, अहमदनगर | निविदा दराने | श्री. निकेतन शिवाजी लोटके, अहमदनगर व निविदा दराने |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनंषंगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदा धारक श्री. निकेतन शिवाजी लोटके, अहमदनगर यांची निविदा निविदा दराने आलेली असुन ती वाजवी वाटत आहेत. सदरची निविदा स्पर्धामकदृष्टया सर्वात कमी दराची आहे.

तरी श्री.निकेतन शिवाजी लोटके, अहमदनगर यांची सर्वात कमी दराची म्हणजे निविदा दराची निविदा मान्यतेस्तव मा.स्थायी समिती पुढे ठेवणेस्तव ऑफिस रिपोट्र सविनय सादर/अ

येणेप्रमाणे उपअभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, या निविदे सोबत प्रभाग क्र.२ व ४ साठीची निविदा ५.४५% कमी दराचे प्राप्त झालेली आहे. या निविदेबाबत संबंधीत ठेकेदार यांचेशी वाटाघाटी करून आणखी दर कमी करणे उचित वाटते. आदेशार्थ सादर.

यावर लेखापरिक्षक / मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केल्याप्रमाणे "अ" प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ७ मधील कलम ७३ क प्रमाणे विभागाने कार्यवाही करावी.

यावर सहाय्यक आयुक्त (सा) यांचा अभिप्राय की, शहर अभियंता यांचे अभिप्रायानुसार

यावर उपायुक्त साहेब यांची अभिप्राया की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर उपअभियंता यांचा अभिप्राय की, फेरसादर , उपरोक्त विषयान्वये रिपोर्ट सादर की, विषयांकित प्रकरणी प्रभाग समिती क्र. २ व ४ साठीची निविदा ५.४५% कमी दराचे प्राप्त झालेली आहे. या निविदेच्या अनुषंगाने श्री. निकेतन शिवाजी लोटके, अहमदनगर यांना निविदा दराचे वाटाघाटीसाठी इकडील पत्र जा.क्र.सा.बां.वि.११५८ दि.०२/०९/२०२१ अन्वये दि.०३/०९/२०२१ रोजी समक्ष दुपारी ४.०० वा उपस्थित राहणेबाबत पत्र दिले असता दि.०३/०९/२०२१ रोजी झालेल्या वाटाघाटीमध्ये संबंधीत ठेकेदार यांनी निविदा दराने काम करणेस तयार असलेबाबत सांगितले व त्यानुसार संबंधीत ठेकेदार श्री. निकेतन शिवाजी लोटके, अहमदनगर यंनी दि.१३/०९/२०२१ रोजी निविदा दराने काम करण्यास तयार असलेबाबत लेखी पत्र दिलेले आहे. तरी सदरचे दर अंदाजपत्रकीय दराने आलेले असून श्री. निकेतन शिवाजी लोटके अहमदनगर यांची निविदा दराची मंजुरीसाठी आदेशार्थ सविनय सादर/अ

यावर शहर अभियंता यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर लेखापरिक्षक / मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण ७ मधील कलम ७३-क नुसार विभागाने कार्यवाही करावी फेरसादर खुलासाप्रमाणे प्रभाग समिती क्र. १ व ३ ची निविदा निविदा दराने मंजुरीस्तव कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभ्रिपाय की, प्रस्तावीत केल्सानुसार मा.स्थायी समिती समोर पुढील कार्यवाहीसाठी सादर करणेस

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- गटर दुरूस्ती सन २०२१-२२ करीता फेर ई - निविदा क्र.२ ई - निविदा क्र.७११०३९ महानगरपालिकेच्या गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता विर्षीक दर निविदा मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट.(प्रभाग समिती क्र.१ व ३)

मा. श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री. शेख मुदस्सर :- चेंबर दुरूस्ती करताना दुरूस्ती झाल्यानंतर चेंबर झाकणाची फुट तुट झाली असल्यास किंवा चेंबर झाकण बसविणे आवश्यक असल्यास त्या ठेकेदार संस्थेकडून मे. शांकुतल कंपनीतील झाकण बसविणे बंधनकारक करण्यात यावे.

मा.श्री.समद खान :- मे. शांकुतलचे झाकण तर बंधनकारक करा तसेच ज्या भागात दुरूस्ती अथवा झाकणाची फुट तुट झाली असल्यास ते बदलणे व नवीन बसविणेकरिता त्या प्रभागातील नगरसेवकांचे पत्र घेणे ही बंधनकारक ठेवा.

मा.सभापती साहेब :- गटर दुरूस्ती सन २०२१-२२ करीता फेर ई - निविदा क्र.२ सुचना क्र.३८७ ई - निविदा क्र.७११०३९ महानगरपालिकेच्या गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक दर निविदा (प्रभाग समिती क्र.१ व ३) श्री. निकेतन शिवाजी लोटके ,अहमदनगर यांचे दर अंदाजपत्रकीय दराने सदरचे काम करण्यास तयार असून यांच्या निविदा दरास मान्यता देण्यात येत आहे. तसेच मे. शांकुतल कंपनीचे चेंबर वरील झाकण बसविणे, त्या त्या प्रभागातील नगरसेवकांचे पत्र व त्या भागातील स्वच्छता निरीक्षक यांचा अहवाल घेणे बंधनकारक करण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिका गटर दुरूस्ती सन २०२१-२२ करीता फेर ई - निविदा क्र.२ सुचना क्र.३८७ ई - निविदा क्र.७११०३९ महानगरपालिकेच्या गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक दर निविदा (प्रभाग समिती क्र.१ व ३) श्री. निकेतन शिवाजी लोटके ,अहमदनगर यांचे दर अंदाजपत्रकीय दराने सदरचे काम करण्यास तयार असून यांच्या निविदा दरास मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर. तसेच मे. शांकुतल कंपनीचे चेंबर वरील झाकण बसविणे, त्या त्या प्रभागातील नगरसेवकांचे पत्र व त्या भागातील स्वच्छता निरीक्षक यांचा अहवाल घेणे बंधनकारक करण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. शेख मुदस्सर सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- १२१ सोमवार दि.२५/१०/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** तिसरी फेर ई-निविदा क्र.७२००८९ अहमदनगर महानगरपालिका हददीतील शहर व उपनगर मधील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या दृष्टीने महत्वाच्या मार्ग रस्त्याचे पॅचिंग करणे (प्रभाग क्र.१ ते ८ अंतर्गत ) या कामाच्या निविदा मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयाबाबत खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकीय मान्यता :- मा.स्थायी समिती सभा क्र.५ठराव क्र.६४ सोमवार दि.२६/०७/२०२१

२.फेर निविदा क्र.७२००८९ सन २०२०-२०२१

३.निविदा विक्री कालावधी :- दि.१३/०९/२०२१ ते १९/०९/२०२१

४.निविदा स्विकारण्याची तारीख - दि.१३/०९/२०२१ ते २०/०९/२०२१

५.निविदा उघडणेचा तारीख - २२/०९/२०२१

६.कामाची मुदत - ०४ महिने

दिनांक २९/०९/२०२१ रोजी झालेल्या छाननी समितीने निविदा अटी व शर्ती नुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या ठेकेदारांच व्यापारी लिफाफा उघडणेस शिफारस केली आहे.त्यानुसार सदरचवी व्यापारी लिफाफा दिनांक ०१/१०/२०२१ रोजी उघडण्यात आलेली आहे.प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील

| ई-निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम GST व्यतीरीक्त | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदे मध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दरचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| फेर - ई निविदा क्र.७२००८९ सन २०२० -२१ | अहमदनगर मनपा हद्दीतील शहर व उपनगर मधील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या मार्ग रस्त्याचे पॅचिंग करणे (प्रभाग क्र.१ ते ८ अंतर्गत ) | ४४,४६,४३२/- | श्री.चेतन मारूती जाधव | निविदा दरापेक्षा ०.००% जादा दराने म्हणजेच निविदा दराने | श्री.चेतन मारूती जाधव अहमदनगर निविदा दराने दराप्रमाणे |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदा धारक श्री.चेतन मारूती जावध,अहमदनगर यांची निविदा स्पर्धात्मक दृष्टया ०.०० % जादा दराची म्हणजे निविदा दराने प्राप्त झालेली आहे.

तरी स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमी दराची श्री.चेतन मारूती जाधव, अहमदनगर यांची निविदा दराची निविदा मा.स्थायी समिती पुढे ठेवणेस प्रशासकिय मान्यतेसाठी ऑफिस रिपोर्ट सविनय सादर./ क

येणेप्रमाणे उपअभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील क प्रमाणे कळविण्यास हरकत नाही .आदेशार्थ सादर.

यावर लेखा परिक्षक / मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र मनपा अधि. १९४९ प्रकरण-७ मधील कलम ७३ क प्रमाणे विभागाने कार्यवाही करून प्रस्तावित केलेनुसार निविदाकाराची निविदा निविदा दराने मंजूरीसाठी कार्यवाहीस्तव सादर./ख

यावर मा.उपायुक्त साहेब यांची अभिप्राय की, प्रस्तावीत "क" "ख" मधील अभिप्रायानुसार सर्वात कमी दराची निविदा मंजूरीसाठी मा.स्थायी समितीसमोर सादर करण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- तिसरी फेर ई-निविदा क्र.७२००८९ अहमदनगर महानगरपालिका हददीतील शहर व उपनगर मधील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या दृष्टीने महत्वाच्या मार्ग रस्त्याचे पॅचिंग करणे (प्रभाग क्र.१ ते ८ अंतर्गत ) या कामाच्या निविदा मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

मा. श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री. सागर बोरूडे :- -अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर व उपनगर मधील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या मार्ग रस्त्याचे पॅचिंग करणे खुप गरजेचे आहे आता पावसाळयाचे दिवस संपले आहे.

मा.श्री. रविंद्र बारस्कर :- रस्त्याची दुरावस्था पहाता आजच ठराव करून दया प्रशासनाने तात्काळ कार्यांरभ आदेश देवुन ठेकेदारास तात्काळ काम सुरू करण्यास सांगा.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हददीतील प्रभाग क्र.१ ते ८ करीता शहर व उपनगर मधील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या मार्ग रस्त्याचे पॅचिंग करणे या कामाच्या फेर ई -निविदा क्र.७२००८९निविदा धारक श्री.चेतन मारूती जाधव,यांची निविदा म्हणजे निविदा दराच्या निविदा दरास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>**ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका हददीतील प्रभाग क्र.१ ते ८ करीता शहर व उपनगर मधील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या मार्ग रस्त्याचे पॅचिंग करणे या कामाच्या फेर ई -निविदा क्र.७२००८९निविदा धारक श्री.चेतन मारूती जाधव,यांची निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- १२२ सोमवार दि.२५/१०/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना फेर ई- निविदा क्रमांक ६९०९५४ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०१ मधील लक्ष्मी कॉलनी व श्रीकृष्णनगर परीसर रस्ते डांबरीकरण करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

विषय- नागरी दलितेतरवस्ती सुधार योजना- सन २०२०-२०२१ अंतर्गत फेर ई-निविदा क्र.६९०९५४ या निविदेच्या मंजुरीबाबत.

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१ प्रशासकीय मान्यता :- मा.जिल्हाधिकरी, अ.नगर यांची दि.२६/०३/२०२१

२ फेर निविदा क्र. ६९०९५४/सन २०२१-२२ दि.२८/०५/२०२१

३.निविदा विक्री कालावधी - दि.२८/०५/२०२१ ते ०४/०६/२०२१

४.निविदा स्विकारण्याची तारीख- दि.२८/०५/२०२१ ते ०४/०६/२०२१

५.निविदा उघडण्याची तारीख - ०७/०६/२०२१

६. कामाची मुदत- ६ महिने

७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील- दि.०८/०९/२०२१ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार

| ई-निविदा क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदे मध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दरचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ६९०९५४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०१ मधील लक्ष्मी कॉलनी व श्रीकृष्णनगर परिसर रस्ते डांबरीकरण करणे | ४४,५७,३०४/- | मे.एस.एफ. शेख, कंस्ट्र, अ.नगर | निविदा दराने | मे.एस.एफ. शेख, कंस्ट्र, अ.नगर निविदा दराने |

वरील रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदा धारक मे. एस.एफ.शेख, कंस्ट्र, अ.नगर यांची सदरची निविदा निविदा दराने आलेली आहे. सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.

तरी मे. एस.एफ.शेख, कंस्ट्र, अ.नगर यांचे आलेली निविदा प्रशासकीय मान्यतेसाठी मा.स्थायी समितीकडेस पाठविणेस मान्यतेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर /अ

येणेप्रमाणे उपअभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा. मुख्यलेपरिक्षक यांची अभिप्राय की, मा. छाननी समितीचे शिफारशीनुसार प्रस्तावानुसार निविदा दराने निविदा मंजुरीबाबत कार्यवाहीस्तव सादर "अ" प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर./ब

यावर मा.उपायुक्त (सा) यांची अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" व "अ" नुसार सर्वात कमी दराची निविदा मंजुरीसाठी मा.स्थायी समिती समोर सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना फेर ई- निविदा क्रमांक ६९०९५४ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०१ मधील लक्ष्मी कॉलनी व श्रीकृष्णनगर परीसर रस्ते डांबरीकरण करणे बाबतचा ऑफिस रिपार्ट.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपार्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपार्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना फेर ई- निविदा क्रमांक ६९०९५४ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०१ मधील लक्ष्मी कॉलनी व श्रीकृष्णनगर परीसर रस्ते डांबरीकरण करणे या कामा करीता मे. एस.एफ.शेख, कंस्ट्र, अ.नगर यांच्या निविदा दराची निविदा सर्वात कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव** :- ऑफिस रिपोर्ट नुसार नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना फेर ई- निविदा क्रमांक ६९०९५४ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०१ मधील लक्ष्मी कॉलनी व श्रीकृष्णनगर परीसर रस्ते डांबरीकरण करणे या कामा करीता मे. एस.एफ.शेख, कंस्ट्र, अ.नगर यांची निविदा दराची सर्वात कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- १२३ सोमवार दि.२५/१०/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गुलमोहर रोड, सुरभि हॉस्पीटल ते कुष्ठधाम रोड पर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

**संदर्भ :-** १. दि.२७/०९/२०२१ रोजी ची मा.आमदार श्री.संग्राम भैय्या जगताप, मा.आयुक्त ,मा.उपायुक्त(सा) उपायुक्त (कर) यांची बैठक

२.मा.आयुक्त साहेब यांची निधीच्या तरतुदी बाबत दि. १ /१०/२०२१ रोजीची मंजूरी.

१.विषयांकीत काम- प्रशासकीय आहे.

२.विषयांकीत काम उपरोक्त मागणीनुसार मी समक्ष पहाणी करून चालू दरसुचीनुसार अंदाजपत्रक मान्यतेसाठी सादर करीता आहे.परंतु कामाची आवश्यकतेबाबत अनुमान हा मनपा आर्थिक स्थितीशी अनुरूप आहे किंवा कसे तसेच वापरलेली दरसुची ,पृथ्थकरण ,अंदाजपत्रकाचा तांत्रिक व प्रशासकिय व लेखापरीक्षण इत्यादीची पुर्नतपासणी होणेकामी व पुढील योग्य ते आदेशासाठी रिपोर्ट सादर करीत आहे. सदर कामाची पहाणी केली असुन कामाची आवश्यकता असल्याबाबत प्रमाणपत्र दिले आहे.

३.सदर कामाची अंदाजपत्रकीय तरतुद खालील प्रमाणे आहे.

लेखाशिर्षक :- नविन रस्ते विकसित करणे सन २०२१-२२ पा नं. /अ.क्र.२

तरतुद- रू.१०६३ लक्ष

यापुर्वीचा खर्च- रू ३५,००,०००/-

प्रस्तावित खर्च :- रू. ४,५३,००,०००/-

एकुण खर्च :- रू. ४८८०००००/-

शिल्लक :- रू. ५७५००००/-

४.कामाची निकड :- सदरचा रस्ता अंदाजे १० वर्षापुर्वी झालेले आहे. रस्त्यावर कायम खडडे पडता पॅचिंग केले तरी दुस-या ठिकाणी खडडे पडतात. त्यामुळे पुर्ण नवीन रस्ता करणे गरजेचे आहे. सदरचा रस्ता उपनगरातील महत्वाचा रहदारी असलेला रोड आहे.

५.कामाचा वाव- गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

६. दरसुची :- म.जि.प्रा.२०१९-२०२०/सा.बा.वि.२०२१-२२

तरी रक्कम रूपये ४,५३,००,०००/- चे कामास "नविन रस्ते विकसित करणे " या लेखाशिर्षका अंतर्गत प्रशासकीय मान्यता मिळणेस प्रस्ताव मान्यतेस सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता श्री.एम.एस.पारखे यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,सहाय्य संचालक नगररनचान विभाग,प्रस्तावित कामासाठी आपल्या अभिप्रायाची आवश्यकता आहे.तरी विषयांकीत कामासाठी आपला अभिप्राय मिळावा.

यावर मा.सहाय्यक संचालक नगररचना यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत काम मंजूर दुस-या सुधारित विकास योजनेतील १८ मी रूंद रस्त्यावरील काम असल्याने सदर काम करणेस हकरत नाही असे मत आहे.

यावर लेखापरिक्षक / मुख्यलेखारिक्षक यांचा अभिप्राय की, नविन रस्ते विकसित करणे या लेखाशिर्ष मध्ये सन २०२१-२२ च्या आर्थिक वर्षात तरतुद २.०५ लक्ष इतकी दिसुन येते. प्रस्तावामध्ये बजेट तरतुद १०.६३ लक्ष कोणत्या आाधारे नमुद केली यांच्या बोध होत नाही. विभागाने स्वयंस्पष्ट अभिप्राय दयावेत.

यावर उपअभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर या विभागाने सर्व संबंधितांशी दि.२७/९/२०२१ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार या विभागाने दि.२७/९/२०२१ रोजी सविस्तर अहवाल सादर केलेनंतर मुख्यलेखाधिकारी व मा.आयुक्त यांचेशी सविस्तर चर्चेनुसार सन २०२१-२२ चे अंदाजपत्राची सविस्तर T-३ नमुद प्रमाणे काही लेखाशिर्षकातील तरतुदी मध्ये फेरबदल व त्याचे प्रस्ताव असुन त्यास T-४ वरील मुख्यलेखाधिकारी यांचे अभिप्रायासह मा.आयुक्त यांनी १/१०/२०२१ रोजी मान्यता दिलेली आहे.

सदर अंदाजपत्रकातील फेरबदल हे शहरातील काही रस्त्यांची झालेली दुरावस्था विविध कारणांमुळे पडलेले खड्डे व इलेक्ट्रीक मेडीया,सामाजिक संघटना व लोकप्रतिनिधी कडून टिका व रस्ता दुरूस्तीची मागणी होत आहे.नागरीकांना सुस्थितीत रस्ते उपलब्ध करून देणे ही महानगरपालिकेचे कर्तव्य व जबाबदारी असल्याने व महानगरपालिकेचे मर्यादित उत्पनाचे स्त्रोत व लेखाशिर्षक निहाय तरतुदी व प्रत्यक्ष उलब्धी याचा विचार विनिमय करूनच प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीत रसते चांगले व सुस्थितीत तातडीने करणे अत्यंत आवश्यक असलेने कायदेशीर बाबींची पुर्तता करणेस वेळ लागणार असल्याने जनक्षोभ,आंदोलने इत्यादीचा विचार करता निविदा प्रक्रिया राबविणे व लवकारात लवकर कामे सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे. या करिता सद्यस्थिती दि.२७/९/२०२१ च्या अहवालात सुचविल्या प्रमाणे अर्थसंकल्पीय तरतुदी प्रमाणे फेरबदलास मा.स्थायी समितीची मान्यता मिळेपर्यतच्या कालावधीत ई - निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे.व या फेरबदलास मा.स्थायी समितीच्या मान्यते नंतरच संबंधितीत कामाचे कार्यारंभ देणे संयुक्तीक राहिल.येणे प्रमाणे रिपोर्ट मान्यतेस तथा आदेशार्थ सादर./अ

यावर शहर अभियंता यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर लेखापरिक्षक /मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.मुलेप यांचे आक्षेपा बाबत उप अभियंता व शहर अभियंता यांची खुलासा नुसार "अ" प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर./ब

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत 'अ' व 'ब' मधील अभिप्रायानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गुलमोहर रोड, सुरभि हॉस्पीटल ते कुष्ठधाम रोड पर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.प्रकाश भागानगरे:- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गुलमोहर रोड, सुरभि हॉस्पीटल ते कुष्ठधाम रोड पर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा अर्थसंकल्पीय तरतुदी प्रमाणे फेरबदलास व ई - निविदा प्रक्रीया राबविणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** ऑफिस रिपार्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गुलमोहर रोड, सुरभि हॅास्पीटल ते कुष्ठधाम रोड पर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतच्या प्रस्तावात नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी प्रमाणे फेरबदलास व ई - निविदा प्रक्रीया राबविणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- १२४ सोमवार दि.२५/१०/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील तारकपुररोड, मनमाडरोड ते मिस्कीनमळा रोड ते तोफखाना पोलीस स्टेशन पर्यत रस्त्याच्या एका बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

विषय-अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील तारकपूररोड, मनमाडरोड ते मिस्कीनमळारोड ते तोफखाना पोलीस स्टेशन पर्यत रस्त्याच्या एका बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकारण करणे.

संदर्भ :- १. दि.२७/०९/२०२१ रोजी ची मा.आमदार श्री.संग्राम भैय्या जगताप, मा.आयुक्त ,मा.उपायुक्त(सा) उपायुक्त (कर) यांची बैठक

२.मा.आयुक्त साहेब यांची निधीच्या तरतुदी बाबत दि. १ /१०/२०२१ रोजीची मंजूरी.

१.विषयांकीत काम प्रशासकीय आहे.

२.विषयांकीत काम उपरोक्त मागणीनुसार मी समक्ष पहाणी करून चालू दरसुचीनुसार अंदाजपत्रक मान्यतेसाठी सादर करीता आहे.परंतु कामाची आवश्यकतेबाबत अनुमान हा मनपा आर्थिक स्थितीशी अनुरूप आहे किंवा कसे तसेच वापरलेली दरसुची ,पृथ्थकरण ,अंदाजपत्रकाचा तांत्रिक व प्रशासकिय व लेखापरीक्षण इत्यादीची पुर्नतपासणी होणेकामी व पुढील योग्य ते आदेशासाठी रिपोर्ट सादर करीत आहे. सदर कामाची पहाणी केली असुन कामाची आवश्यकता असल्याबाबत प्रमाणपत्र दिले आहे.

३.सदर कामाची अंदाजपत्रकीय तरतुद खालील प्रमाणे आहे.

लेखाशिर्षक :- नविन रस्ते विकसित करणे सन २०२१-२२ अ.नं. पान नं. /५

तरतुद- रू.१०६३ लक्ष

यापुर्वीचा खर्च- रू ८८३०००००/-

प्रस्तावित खर्च :- रू. १८००००००/-

एकुण खर्च :- रू. १०६३००००००/-

शिल्लक :- निरंक

४.कामाची निकड :- सदरचा रस्ता उपनगरातल नगर-मनमाड या रस्त्याला जोडणारा रस्ता आहे.सदर रस्त्यावरून मोठया प्रमाणावर वाहतूक होते. सदर रस्ता अंदाजे १० वर्षापुर्वी झालेला आहे. त्यामुळे रस्त्याला बी.एम. रोड मजबुती करून कारपेट करणे आवश्यक आहे. यामुळे रस्त्याचे आयुष्य वाढण्यास मदत होणार आहे.

५.कामाचा वाव- गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

६. दरसुची :- म.जि.प्रा.२०१९-२०२०/सा.बा.वि.२०२१-२२

तरी रक्कम रूपये १,८०,००,०००/- चे कामास "नविन रस्ते विकसित करणे " या लेखाशिर्षका अंतर्गत प्रशासकीय मान्यता मिळणेस प्रस्ताव मान्यतेस सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता श्री.एम.एस.पारखे यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,सहाय्य संचालक नगररनचान विभाग,प्रस्तावित कामासाठी आपल्या अभिप्रायाची आवश्यकता आहे.तरी विषयांकीत कामासाठी आपला अभिप्राय मिळावा.

यावर मा.सहाय्यक संचालक नगररचना यांचा अभिप्राय की, विषयांकित काम हे मंजुर विकास योजनेतील नियमात २०.०० मी रूंद रस्त्याचे बाजुने प्रस्तावीत केलेले आहे सबब सदर काम करणेस हकरत नाही.

यावर लेखापरिक्षक / मुख्यलेखारिक्षक यांचा अभिप्राय की, नविन रस्ते विकसित करणे या लेखाशिर्ष मध्ये सन २०२१-२२ च्या आर्थिक वर्षात तरतुद २.०५ लक्ष इतकी दिसुन येते. प्रस्तावामध्ये बजेट तरतुद १०.६३ लक्ष कोणत्या आधारे नमुद केली यांच्या बोध होत नाही. विभागाने स्वयंस्पष्ट अभिप्राय दयावेत.

यावर उपअभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर या विभागाने सर्व संबंधितांशी दि.२७/९/२०२१ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार या विभागाने दि.२७/९/२०२१ रोजी सविस्तर अहवाल सादर केलेनंतर मुख्यलेखाधिकारी व मा.आयुक्त यांचेशी सविस्तर चर्चेनुसार सन २०२१-२२ चे अंदाजपत्राची सविस्तर T-३ नमुद प्रमाणे काही लेखाशिर्षकातील तरतुदी मध्ये फेरबदल व त्याचे प्रस्ताव असुन त्यास T-४ वरील मुख्यलेखाधिकारी यांचे अभिप्रायासह मा.आयुक्त यांनी १/१०/२०२१ रोजी मान्यता दिलेली आहे.

सदर अंदाजपत्रकातील फेरबदल हे शहरातील काही रस्त्यांची झालेली दुरावस्था विविध कारणांमुळे पडलेले खड्डे व इलेक्ट्रीक मेडीया,सामाजिक संघटना व लोकप्रतिनिधी कडून टिका व रस्ता दुरूस्तीची मागणी होत आहे.नागरीकांना सुस्थितीत रस्ते उपलब्ध करून देणे ही महानगरपालिकेचे कर्तव्य व जबाबदारी असल्याने व महानगरपालिकेचे मर्यादित उत्पनाचे स्त्रोत व लेखाशिर्षक निहाय तरतुदी व प्रत्यक्ष उलब्धी याचा विचार विनिमय करूनच प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीत रसते चांगले व सुस्थितीत तातडीने करणे अत्यंत आवश्यक असलेने कायदेशीर बाबींची पुर्तता करणेस वेळ लागणार असल्याने जनक्षोभ,आंदोलने इत्यादीचा विचार करता निविदा प्रक्रिया राबविणे व लवकारात लवकर कामे सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे. या करिता सद्यस्थिती दि.२७/९/२०२१ च्या अहवालात सुचविल्या प्रमाणे अर्थसंकल्पीय तरतुदी प्रमाणे फेरबदलास मा.स्थायी समितीची मान्यता मिळेपर्यतच्या कालावधीत ई - निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे.व या फेरबदलास मा.स्थायी समितीच्या मान्यते नंतरच संबंधितीत कामाचे कार्यारंभ देणे संयुक्तीक राहिल.येणे प्रमाणे रिपोर्ट मान्यतेस तथा आदेशार्थ सादर./अ

यावर शहर अभियंता यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर लेखापरिक्षक /मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.मुलेप यांचे आक्षेपा बाबत उप अभियंता व शहर अभियंता यांची खुलासा नुसार "अ" प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर./ब

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत 'अ' व 'ब' मधील अभिप्रायानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील तारकपुररोड, मनमाडरोड ते मिस्कीनमळा रोड ते तोफखाना पोलीस स्टेशन पर्यत रस्त्याच्या एका बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.प्रकाश भागानगरे:- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील तारकपुररोड, मनमाडरोड ते मिस्कीनमळा रोड ते तोफखाना पोलीस स्टेशन पर्यत रस्त्याच्या एका बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतच्या प्रस्तावामध्ये नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी प्रमाणे फेरबदलास व ई - निविदा प्रक्रीया राबविणेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपार्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील तारकपुररोड, मनमाडरोड ते मिस्कीनमळा रोड ते तोफखाना पोलीस स्टेशन पर्यत रस्त्याच्या एका बाजुने गटर करणे व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतच्या प्रस्तावामध्ये नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी प्रमाणे फेरबदलास व ई - निविदा प्रक्रीया राबविणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ०८**

विषय क्रमांक- १२५ सोमवार दि.२५/१०/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.२ आणि वॉर्ड क्र.४ मधील गुलमोहर पोलीस चौकी ते पाईप लाईन रोड श्रीराम चौक पर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

संदर्भ :- १. दि.२७/०९/२०२१ रोजी ची मा.आमदार श्री.संग्राम भैय्या जगताप,
मा.आयुक्त ,मा.उपायुक्त(सा) उपायुक्त (कर) यांची बैठक
२.मा.आयुक्त साहेब यांची निधीच्या तरतुदी बाबत दि. /१०/२०२१ रोजीची मंजूरी.

१.विषयांकीत काम प्रशासकीय आहे.

२.विषयांकीत काम उपरोक्त मागणीनुसार मी समक्ष पहाणी करून चालू दरसुचीनुसार अंदाजपत्रक मान्यतेसाठी सादर करीता आहे.परंतु कामाची आवश्यकतेबाबत अनुमान हा मनपा आर्थिक स्थितीशी अनुरूप आहे किंवा कसे तसेच वापरलेली दरसुची ,पृथ्थकरण ,अंदाजपत्रकाचा तांत्रिक व प्रशासकिय व लेखापरीक्षण इत्यादीची पुर्नतपासणी होणेकामी व पुढील योग्य ते आदेशासाठी रिपोर्ट सादर करीत आहे.

३.लेखाशिर्षक :- नविन रस्ते विकसित करणे सन २०२१-२२ अ.नं.१ पान नं.

तरतुद रू.१०६३ लक्ष

यापुर्वीचा खर्च रू निरंक

प्रस्तावित खर्च :- रू.३५,००,०००/-

एकुण खर्च :- रू.३५,००,०००/-

शिल्लक :- रू १०२८०००००/-

४.कामाची निकड :- सदरचा रस्ता उपनगरातल महत्वाचा रहदारीचा रस्ता आहे.सदरचा रस्ता खराब झालेला आहे.नागरीकांच्या सोईसाठी रस्ता करणे आवश्यक आहे.

५.दरसुची :- सा.बा.वि.२१/२२ चे दरसुचीनुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केले आहे.तरी रक्कम रूपये ३५,००,०००/-चे कामास व खर्चास "नविन रस्ते विकसित करणे " या लेखाशिर्षका अंतर्गत कामास व खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस व कामास मा.स्थायी समिती ची प्रशासकीय मान्यता मिळणेस सविनय सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता श्री.एम.एस.पारखे यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,सहाय्य संचालक नगररनचान विभाग,प्रस्तावित कामासाठी आपल्या अभिप्रायाची आवश्यकता आहे.तरी विषयांकीत कामासाठी आपला अभिप्राय मिळावा.

